# दत्तकपण #२
## जेफरसनविले, इंडियाना, अमेरिका
## ६०-०५१८

1 ... मंडळी म्हणून आज रात्री आम्ही नतमस्तक होतो, पाचारण केलेल्यांचा जमाव म्हणून, आज रात्री येथे विश्वासणारे म्हणून, लोकांना तुझे वचन शिकविण्यासाठी, शरीरात आम्हाला योग्य दर्जात स्थानापन्न करण्यासाठी, की ... जेथे आम्ही संबंधित आहोत, आणि जेथे आम्ही ख्रिस्ताच्या शरीराचे अंग म्हणून एकत्र योग्य रीतीने कार्य करु शकतो.

आणि आता आम्हाला तात्काळ देवाकडे जाण्यासाठी पाचारले गेले आहे. आणि आमच्यातील प्रत्येक पिता विचार करतो की ... काय जर ती आमची लहान मुलगी असती? कसे आमचे हृदय आमच्या आतमध्ये नाखूष आणि दुःखी झाले असते; आणि आम्ही तात्काळ मंडळ्यांना प्रार्थना करण्यासाठी बोलाविले असते. आणि काही वडिलांची हृदये नाखूश आहेत, दुखत आहेत. परमेश्वरा, तो महान पवित्र आत्म्याचा व्यक्ती आताच त्या पित्याच्या हृदयामध्ये येवो. प्रत्येक शंकेची सावली काढून टाक, आणि प्रत्येक दुखणे, आणि त्याला समजू दे की तू देव आहेस आणि जेव्हा तुझी दैवी कामगिरी तुझ्या मंडळीद्वारे आणि तुझ्या लोकांद्वारे पार पाडली जाते तुझ्या उपस्थितीत कोणताही आजार उभा राहू शकत नाही.

2 आणि आठवडाभर, आम्ही प्रार्थना करीत आहोत, गेल्या रविवारपासून मी या मार्गावर, किंवा या प्रार्थनेच्या, माध्यमावर विचार केला आहे. आमच्याकडे खूप काही मोठे शस्त्र नाही जगाच्या दृष्टीने, परंतु ही लहानशी गोफण प्राणघातक आहे जेव्हा ती विश्वासाच्या बोटामध्ये धरली जाते. हे परमेश्वरा, आमच्या प्रार्थनांनी घराला प्रहार करो - तो मृत्यू जो त्या बालकावर पलीकडे लटकलेला आहे - आणि तो अंधकार, खिन्नता, भंग पाऊ दे; त्या बालकाच्या, ते बाळ किंवा मुल, लहान मुलीच्या, पलंगा बाजूने दूर जावो. देवाच्या उपस्थितीचा महान प्रकाश त्यावर प्रकाशू दे, आणि दवाखान्यातून बाळ चांगले होऊन येऊ दे.

देवा, आम्हाला ठाऊक आहे अगदी नदीच्या पलीकडे आमचे प्रियजन वाट पाहत आहेत, आणि ते गौरवी आहे. परंतु आम्ही आमच्या लेकरांना प्रेम करतो. आणि आम्ही प्रार्थना करतो, प्रभू, की तुझ्या गौरवासाठी, की तू त्या बालकाचे जीवन वाचवशील. आम्ही, तुझी मंडळी म्हणून, त्या मृत्यूचा निषेध करतो, आणि म्हणतो, "पलीकडे स्तब्ध उभा रहा. तू त्या बालकाला घेऊ शकत नाही, कारण आम्ही त्याच्या जीवनावर देवाच्या राज्याकरिता दावा करितो." या गोष्टी मान्य कर, प्रभू, त्या खुणेकडे सरळ जाण्यासाठी जसे आम्ही त्यांना निर्देश करतो, येशू ख्रिस्ताच्या नावात, आमचा तारक. आमेन.

3 आपण विश्वास करतो? मला ठाऊक नाही जर मी ख्रिस्ती नसतो तर मी काय केले असते. मला अगदी अजून जास्त काळ रहावेसे वाटले नसते. तेथे जगण्यासाठी काही नाही, केवळ इतरांनी वाचावे, हेच काय ते चांगले मला ठाऊक आहे.

आता, आज रात्री आम्हाला आपल्या मागील धड्याची अगदी थोडीशी पार्श्वभूमी सुरु करायची आहे. आणि मी वाचण्याचा प्रयत्न करीन ... कारण ... अखंड अध्याय, जर मी, आज रात्री, वाचू शकतो. मग रविवार सकाळी.... मला कदाचित दोन्ही रविवार सकाळ आणि रात्र घ्यावी लागेल, जर ते ठीक असेल, या मांडणी मध्ये येण्याचा प्रयत्न करण्यासाठी जे काही मंडळीने पाहावे असे मला वाटते. ओह, आपले स्थान शोधणे हे गौरवी आहे!

आणि कोणीही काहीही करु शकत नाही जोपर्यंत तुम्हाला योग्य रीतीने ठाऊक नसेल तुम्ही काय करता.

4 काय जर तुमची शस्त्रक्रिया होणार असेल? आणि तेथे एक तरुण वैद्य असेल जो आताच शाळेतून आला असेल, ज्याने.... कधीही अगोदर शस्त्रक्रिया केली नसेल. तरीही, तो तरुण आणि देखणा असेल, आणि त्याचे केस चमकणारे असतील, आणि त्याने खूप चांगली वस्त्रे परिधान केली असतील, सभ्यपणाने, आणि सर्वकाही. आणि तो म्हणाला, "मी सुरीला धार लावून ठेवली आहे, आणि सर्व उपकरणे आणि गोष्टी मी निर्जंतुकीकरण करुन ठेवल्या आहेत." परंतु तुम्हाला थोडीशी त्याबद्दल विचित्र भावना असेल.

मी त्याऐवजी वृद्ध वैद्याला घेईन जो, मला कापण्यापूर्वी, त्या शस्त्रक्रियेमधून कित्येक वेळेस गेला असेल. मला अशा कोणालातरी समजायचे आहे जो केवळ शाळेतून आला नसेल, परंतु मला कोणीतरी काही अनुभवाचा हवा आहे. आणि उत्तम अनुभवाचा असा जो मला ठाऊक आहे ज्याला आज रात्री बोलावू शकतो तो पवित्र आत्मा आहे. तो देवाचा महान वैद्य आणि महान शिक्षक आहे.

5 आणि आज रात्रीच्या माझ्या संदेशाच्या पार्श्वभूमीसाठी, रविवारच्या संदेशातूनच, की ते.... त्यांनी शमुवेलाला परमेश्वराच्या वचनाबरोबर नाकारले; आणि शौलाला, किशाच्या पुत्राला स्वीकारले. आणि शमुवेलाला नाकारले, जो पवित्र आत्म्याला दर्शवितो कारण तो केवळ बोलला जसे आत्म्याने त्याला बोलण्याचे नेतृत्व केले. आणि जेव्हा त्याने त्याकडे त्यांचे लक्ष वेधले, तो म्हणाला, "लक्षात ठेवा, मी तुम्हाला परमेश्वराच्या नावात असे काही बोललो नाही जे कधी प्रत्ययास आले नाही. मी तुमच्यासमोर गैरशिस्तीने चाललो नाही. आणि कोणीही मला पापाबद्दल दोष लावू शकत नाही."

जसे येशू म्हणाला, "कोण मला पापाबद्दल दोष लावू शकतो?" पहा?

आणि तो परत म्हणाला, की, "मी तुमच्याकडे येऊन, पैशासाठी भीक मागितली नाही आणि इत्यादी. मी तुमच्याकडून काहीही घेतले नाही. परंतु जे काही मी म्हणालो ते तुमच्या चांगल्यासाठी होते, जे मी तुमच्यासाठी परमेश्वराच्या मुखातून आणले आहे."

आणि सर्व लोकांनी साक्ष दिली, "ते खरे आहे. ते सर्व खरे आहे, परंतु तरीही आम्हाला राजा हवा आहे. आम्हाला इतर जगासारखे व्हायचे आहे."

6 आता, आज रात्री, आपला शास्त्रलेख विभागत आहे.... इफिसकरांस पुस्तक हे नव्या करारातील यहोशवाचे पुस्तक आहे. ते विभागत आहे आणि "जय प्राप्त करणाऱ्यांची" अनुक्रमाने मांडणी करीत आहे. आता, काही मिनिटासाठी फक्त पार्श्वभूमी, स्थळ मिळण्यासाठी आपण वाचण्याअगोदर, तिसऱ्या पदापासून सुरुवात करीत आहोत. आता, गेल्या रविवारी रात्री आपल्याला आढळले की जुन्या करारात देवाने इस्राएलाला विश्रामासाठी भूमीचे अभिवचन दिले होते, कारण ते भटकणारे आणि यात्रेकरु होते, आणि ते त्या भूमीत होते जी त्यांची नव्हती. आणि देवाने अब्राहामाद्वारे अभिवचन दिले होते की तो वास करील ... त्याची संतती चारशे वर्ष अनोळखी लोकांमध्ये वास करील, आणि गैरवर्तन केले जाईल, परंतु मजबूत बाहूने तो त्यांना बाहेर काढील अशा चांगल्या भूमीमध्ये जी दूध आणि मधाची असेल.

7 आणि, आता, जेव्हा अभिवचनाचा समय जवळ आला, देवाने कोणालातरी त्यांना भूमीत आणण्यासाठी उभे केले. आज वर्गामध्ये किती लोकांना ठाऊक आहे तो एक कोण होता? मोशे. लक्ष द्या, खूप, खूप वास्तविक प्रतीक त्या एकाचे जो आपल्याला वचनदत्त देशात आणण्यासाठी दिला गेला होता - ख्रिस्त. आता आपल्याकडे अभिवचन आहे, कारण आपले अभिवचन हे आत्मिक विश्राम आहे, जेथे त्यांच्यासाठी शारीरिक विश्राम होता. आणि म्हणून ते त्या भूमीत येत होते ज्याला ते म्हणू शकत होते, "ही आमची भूमी आहे. आम्ही यापुढे भटकणारे नाहीत. आम्ही स्थायिक झालो आहोत. ही आमची भूमी आहे, आणि येथे आम्हाला विश्राम आहे. आम्ही आमचे धान्य पेरु, आमचे द्राक्षाचे मळे, आणि आम्ही आमच्या द्राक्षाच्या मळ्यातून खाऊ. आणि मग जेव्हा आम्ही निघून जाऊ, आम्ही ते आमच्या लेकरांसाठी ठेवून जाऊ."

8 ओह, आपण कसे काय या भूमीत जाऊ शकतो, वारसा हक्काचा नियम - जसे नामी आणि रुथ, बवाजाने - ते सर्व परत आणले. कसा इस्राएलातील भाऊ, कसा तो ... जे काही त्याने गमावले होते ते नातेवाईकाने सोडवावयास हवेच. ओह, किती सुंदर! ते आठवडे आणि आठवडे आणि आठवडे आणि आठवडे घेईल, त्यामध्ये जाण्यासाठी, हा धडा आपण कधी सोडू शकणार नाही. आपण अखंड पवित्रशास्त्र सरळ यामध्ये, सरळ या एका अध्यायामध्ये, बांधू शकतो. आणि, ओह, त्याचा अभ्यास करण्यास मला अगदी आवडते. आम्ही ते घेत असू, आणि दीड वर्षापर्यंत घेत असू, आणि पुस्तकाला सोडीत नसू. फक्त सरळ त्याच्याबरोबर रहा.

9 आता, परंतु ती इतकी महान गोष्ट होती की वारसाहक्क ... कसे ते की भूमीमधील वारसाहक्क, की कोणी नाही परंतु जवळचा आप्त ते वतन सोडवू शकतो. आता, मला अगदी येथे छोटेसे चिन्ह टाकू द्या ज्याला मी त्या रात्री स्पर्श केला, तुम्हा आयांसाठी. तुमच्यातील किती जणांनी तुमच्या प्रियजनांसाठी प्रार्थना केली, जे गमावलेले आहेत? ठीक आहे. परत तुम्ही तेथे आहात, पहा - तुमचा वारसाहक्क, पहा.

पौलाने रोमनला सांगितले, म्हणाला, "प्रभू येशू ख्रिस्तावर विश्वास कर, आणि तू आणि तुझ्या घराण्याचे तारण होईल." जर तुम्हाला तुमच्या स्वतःसाठी तारण्यास पुरेसा विश्वास असेल, पुरेसा विश्वास ठेवा ... काही फरक पडत नाही तो मुलगा किती लहरी आहे, किंवा ती मुलगी, ते कसेहीकरुन तारले जातील. देव, कसेहीकरुन.... जर त्याला त्यांना त्यांच्या पाठीवर झोपवावे लागले, तेथे दवाखान्यात झोपून, मरत असतील, ते तारले जातील. देवाने त्याचे अभिवचन दिले आहे. वारसाहक्क! ओह! "आणि ते तेथे असतील," यशया म्हणाला, "आणि त्यांची सर्व संपत्ती त्यांच्याबरोबर. माझ्या पवित्र डोंगरावर त्यांना कोणी उपद्रव देणार नाही व नासधूस करणार नाही, परमेश्वर असे म्हणतो."

ओह, माझ्याकडे लहानसे स्थळ आहे मी आशा करतो आज रात्री तुमच्यासाठी मी त्यामध्ये जाईन, ते अगदी माझ्या हृदयामध्ये प्रदीप्त होत आहे, त्याचे - त्याकडे परत येऊया.

परंतु आता, पुढे जाऊया.

10 मग तुम्ही मोशेकडे लक्ष दिले का, तो महान चमत्कार करणारा ज्याने इस्राएलाला देशातून खाली आणले, आणि त्यांना वर वचनदत्त देशात आणले, परंतु त्यांना त्यांच्या वतनात स्थानापन्न केले नाही? त्याने त्यांना त्यांचे वतन दिले नाही. त्याने त्यांचे देशापर्यंत नेतृत्व केले, परंतु यहोशवाने लोकांना भूमी विभागून दिली. ते बरोबर आहे? आणि ख्रिस्ताने मंडळीला त्या स्थानापर्यंत आणले जेथे त्यांचे वतन त्यांच्यासाठी बनविले होते, त्यांना दिले गेले होते, अगदी यार्देन पार करुन, परंतु पवित्र आत्मा एक आहे जो मंडळीला अनुक्रमाने स्थानापन्न करतो. आजचा यहोशवा मंडळीला तिच्या योग्य क्रमात ठेवतो, प्रत्येकाला दाने, स्थळ, दर्जा देतो. आणि तो देवाची वाणी आहे जी आतील मनुष्याशी बोलते ज्याला ख्रिस्ताने तारले आहे, पवित्र आत्मा.

आता तुम्हाला त्यापैकी इतके कळाले का? आता आपण इफिसकराच्या पुस्तकात जात आहोत. आता, त्याच प्रकारे, तो योग्यरित्या मंडळीला स्थानापन्न करीत आहे जेथे ती संबंधीत आहे. आता, यहोशवाने त्यांना नैसर्गिक भूमीत स्थानापन्न केले. आता पवित्र आत्मा मंडळीला, योग्यरित्या, ती ज्या दर्जाशी संबंधीत आहे, तिच्या वतनात, भूमीमध्ये, स्थानापन्न करीत आहे.

11 आता, पहिली गोष्ट तो येथे सुरु करीत आहे, तो त्याचे पत्र संबोधित आहे - पौल. जे, आपण काही वेळाने शोधून काढणार आहोत की ही सर्व रहस्ये त्याला प्रकट झाली होती - विद्यालयात नाही, कोणत्या धर्म शास्त्रज्ञाद्वारे नाही, परंतु ते पवित्र आत्म्याचे दैवी प्रकटीकरण होते जे देवाने पौलाला दिले. माहिती होती की देवाची रहस्ये, तो म्हणाला, जी जगाच्या पायारंभापूर्वी पासून गुप्त होती, ती त्याला पवित्र आत्म्याद्वारे प्रकट झाली होती.... आणि लोकांमधील पवित्र आत्मा प्रत्येकाला अनुक्रमाने स्थानापन्न करीत होता, मंडळीला जागेत मांडीत होता.

12 आता, पहिली गोष्ट पौल येथे लोकांना सांगण्यास सुरुवात करीत आहे, ती म्हणजे सर्व घेणे....

लक्षात ठेवा, हे मंडळीसाठी आहे, बाहेरील व्यक्तीसाठी नाही. त्याच्यासाठी ते कोड्यातील रहस्य आहे, कधीही ते समजण्यास समर्थ ठरणार नाही, ते त्याच्या डोक्यावरुन जाईल. त्याला त्याबद्दल अधिक काही माहिती नसेल. परंतु मंडळीसाठी ते खडकातील मध आहे, तो अनिर्वाच्य आनंद आहे, ते आशीर्वादित आश्वासन आहे, तो जीवाचा नांगर आहे, ती आपली आशा आणि मुक्काम आहे, तो युगाचा खडक

आहे. ओह, ते सर्वकाही जे चांगले आहे ते आहे, कारण पृथ्वी आणि आकाश नाहीसे होईल, परंतु देवाचे वचन कधीही नाहीसे होणार नाही.

13 परंतु कनानाच्या बाहेरील मनुष्याला त्याबद्दल काही माहित नसेल. तो अजूनही भटकणारा आहे. असे म्हणत नाही की तो चांगला मनुष्य नाही. मी तसे म्हणत नाही. मी असे ही म्हणत नाही की मिसरातील मनुष्य हा चांगला मनुष्य नाही. परंतु जोपर्यंत तो पलीकडे या मालकीत येत नाही....

आणि मालकी जी ... अभिवचन जे मंडळीला दिले गेले होते ते नैसर्गिक भूमीचे नाही, परंतु आत्मिक भूमीचे आहे, कारण आपण शाही याजकगण, पवित्र राष्ट्र आहोत. मग या शाही याजकगणात - पवित्र राष्ट्रात, असाधारण लोक, पाचारण केलेले, निवडलेले, पसंत केलेले, बाजूला राखलेले - मग सर्व जग बाहेर मृत आहे, आणि आपण आत्म्याद्वारे चालविलेले आहोत. देवाचे पुत्र व कन्या देवाच्या आत्म्याद्वारे चालविले जातात. मनुष्यद्वारे नाही, परंतु आत्म्याद्वारे.

14 सर्व प्रेमात, अखंड गोष्ट आता बांधली गेली आहे. हे कित्येक वेळेस शिकविण्याचा प्रयत्न केला गेला, आणि शंका नाही की महान धर्मशास्त्रज्ञांनी मी जेवढा गहनतेत जाऊ शकतो त्यापेक्षा अधिक प्रहार केला आहे. परंतु जी गोष्ट मी तुम्हाला समजून देण्याचा प्रयत्न करीत आहे ती ही: की मनुष्य जो ख्रिस्तामध्ये आहे, पवित्र आत्म्याबरोबर, तो मनुष्याचे सहन करु शकतो जेव्हा तो चुकीचा असतो. सहनशीलता, सौम्यता, धीर; तो मधुर असतो, नम्र, विश्वासू, आत्म्याने भरलेला. कधीही नकारात्मक नाही, नेहमी सकारात्मक. तो एक वेगळा व्यक्ती आहे.

केवळ एक मनुष्य नाही जो.... "जर आपण ओरडलो आपल्याला तो एकदा मिळाला, आपल्याला मिळाला - आपण मेथडिस्ट. ओह, जेव्हा आपण ओरडलो, आपण भूमीत होतो." ते चांगले आहे. ते ठीक आहे. मी देखील, ते विश्वास करतो.

मग पेन्टिकॉस्टल पुढे आले अन्य भाषेत बोलत. त्यांच्याकडे होता - प्रत्येकजण अन्य भाषेत बोलला त्याच्याकडे होता. त्यावर देखील, मी विश्वास करतो. परंतु तरीही आपल्याला आढळले की तरीही खूपजणांकडे तो नव्हता, पहा. पहा?

15 आता आपण या महान गुप्त रहस्याकडे येत आहोत जे जगाच्या पायारंभापासून गुप्त होते आणि आता या शेवटच्या दिवसात देवाच्या पुत्रांसाठी प्रकट केले जात आहे. ते खरे आहे असा तुम्ही विश्वास करता, की देवाचे पुत्र प्रकट झाले आहेत? आपण दुसरीकडे अगदी जाण्याअगोदर, रोमकरांसमध्ये वळूया, आठवा अध्याय, फक्त एक मिनिट. मला तुमच्यासाठी काही वाचू द्या. पहा जर हे अगदी त्याकडेच येत आहे जे मी येथे बोलत आहे. आता आपण रोमकरांस ८ मध्ये जात आहोत, रोमकरांस आठवा अध्याय एकोणीस पद:

कारण सृष्टी देवाच्या पुत्रांच्या प्रकट होण्याची प्रतीक्षा ... अत्यंत उत्कंठेने करीत आहे.

16 अत्यंत उत्कंठेने संपूर्ण सृष्टी प्रकट होण्याची वाट पाहत आहे. पहा, प्रकट होणे. प्रकट होणे काय आहे? ज्ञात करणे.

संपूर्ण जग. मुसलमान पलीकडे, ते त्याची वाट पाहत आहे. सभोवार, सर्वत्र, ते याकडे पाहत आहे. "हे लोक कोठे आहेत?" आपल्याकडे.... आपल्याकडे सोसाट्याचा वारा होता, आपल्याकडे गर्जना व विजेचा कडकडाट होता, आपल्याकडे तेल व रक्त होते. आपल्याकडे सर्व प्रकारच्या गोष्टी होत्या, परंतु आपण ती लहानशी मंद वाणी जिने संदेष्ट्याला आकर्षित केले ती ऐकण्यास चुकलो, जो त्याच्या भोवती झगा गुंडाळून, बाहेर पडला, म्हणाला, "मी येथे आहे, परमेश्वरा," पहा?

17 आता संपूर्ण सृष्टी कण्हत आहे व देवाच्या पुत्राच्या प्रकट होण्याची वाट पाहत आहे. आता पौल मंडळीला प्रथम तंतोतंत त्या ठिकाणी ठेवण्यास जात आहे जेथे तिची योग्य जागा आहे. आता फक्त पार्श्वभूमी कळण्यासाठी, परत वाचूया.

इफिस येथील, संतजन ["पवित्रजन"] व ... ख्रिस्त येशूच्या ठायी विश्वास ठेवणारे, ह्यास देवाच्या इच्छेनुसार झालेला ख्रिस्त येशूचा प्रेषित, पौल, ह्याच्याकडून ते जे....

आता, जेणेकरुन वर्ग ते विसरणार नाही, आपण कसे ख्रिस्तामध्ये येतो? आपण ख्रिस्तामध्ये येण्यासाठी मंडळीत सामील होतो? आपण ख्रिस्तामध्ये येण्यासाठी आपण अमुक आहोत असे म्हणतो? आपल्याला ख्रिस्तामध्ये येण्यासाठी पाण्यात बुडावे लागेल? आपण ख्रिस्तामध्ये कसे येतो? १ करिंथ, बारावा अध्याय: "कारण एका आत्म्याद्वारे [एक आ-त्मा[S-p-i-r-i-t], जो पवित्र आत्मा आहे] आपणा सर्वांचा वचनदत्त भूमीत बाप्तिस्मा झाला आहे."

18 या वचनदत्त भूमीत, सर्वकाही आपल्या मालकीचे आहे. वचनदत्त भूमीमध्ये. भाऊ कॉलिन्स, ते पाहता, पहा? सर्वकाही वचनदत्त भूमीत आहे. जेव्हा इस्राएलाने ही यार्देन ओलांडली, अभिवचनाच्या भूमीत आले, सर्वकाही लढून घेतले....

आता लक्षात ठेवा, या अभिवचनाच्या भूमीत, याचा अर्थ असा नाही की तुम्ही आजारापासून मुक्त आहात, त्याचा अर्थ असा नाही की तुम्ही संकटापासून मुक्त आहात. परंतु ते असे म्हणते (ओह, हे खोलवर मुरु द्या!), असे लिहिले आहे: की ते तुमचे आहे! फक्त उठा आणि ते घ्या, पहा?

19 आणि, लक्षात ठेवा, केवळ एकाच मार्गाने इस्राएलाने कधी एक माणूस गमावला, जेव्हा पाप छावणीत आले. त्याच प्रकारे आपण कधी विजय गमावू, जेव्हा पाप छावणीत येईल, कुठेतरी काहीतरी चुकीचे आहे. जेव्हा आखानाने ती वीट आणि शिनारी झगा चोरला, पाप छावणीत आले, आणि युद्ध चुकीच्या मार्गाने गेले.

तुम्ही मला आज रात्री ही मंडळी द्या, या लोकांचा जमाव, परिपूर्ण, परिपूर्ण, देवाच्या अभिवचनात, पवित्र आत्म्याबरोबर, आत्म्यामध्ये

चालत असलेले, मी तेथे असलेल्या कोणत्याही रोगाला किंवा कोणत्याही पीडेला, किंवा कशालाही जे तेथे आहे आव्हान करीन; देशात असलेल्या प्रत्येक जो लेव्हिसला, त्याच्या सर्व नास्तिकतेसह, आणि सर्व अविश्वासू जे तेथे आहेत, कोणताही आजार किंवा पीडा या दरवाज्यात आणा आणि ते येथून पूर्ण होऊन बाहेर पडतील. होय, महाशय. देवाने अभिवचन दिले आहे; केवळ अविश्वासाचे पाप त्याला दूर राखू शकते. आता थोड्या वेळाने, हे लहानसे पाप काय आहे हे आपण पाहणार आहोत. आता:

... जे ख्रिस्त येशूमध्ये आहेत:

देव आपला पिता, व ... प्रभू येशू ख्रिस्त ह्यांच्यापासून, तुम्हाला कृपा, व शांती असो.

आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताचा देव व पिता धन्यवादित असो, त्याने स्वर्गातील सर्व अध्यात्मिक आशीर्वाद देऊन आपल्याला ख्रिस्तामध्ये आशीर्वादित केले आहे:

20 जेव्हा आपण ख्रिस्तामध्ये असतो, आपल्याकडे आत्मिक आशीर्वाद असतात; ख्रिस्ताबाहेर, आपल्याला संवेदना असतात. ख्रिस्तामध्ये आपल्याकडे सकारात्मक आशीर्वाद असतात. ढोंगी विश्वास नाही, लबाडी नाही, फसवणूक नाही. परंतु जोपर्यंत तुम्ही वचनदत्त भूमीत असल्याचे सांगण्याचा प्रयत्न करता, आणि नाही आहात, तुमचे पाप तुम्हाला शोधून काढील. आणि पहिली गोष्ट तुम्हाला ठाऊक आहे, तुम्ही स्वतःला अस्थिर आणि सर्वकाही असे पाहाल, (जसे आपण जगात म्हणतो) चिकटलेले असे. तुम्हाला आढळेल की तुम्ही ज्याबद्दल बोलता ते तुमच्याकडे नाही. परंतु जेव्हा तुम्ही ख्रिस्त येशूमध्ये असता, तो तुम्हाला स्वर्गीय शांतीचे, स्वर्गीय आशीर्वादाचे, स्वर्गीय आत्म्याचे अभिवचन देतो, सर्वकाही तुमचे आहे. तुम्ही अभिवचनाच्या भूमीत आहात आणि सर्वकाही तुमच्या मालकीचे आहे. आमेन. किती सुंदर! ओह, अभ्यास करुया.

त्याप्रमाणे त्याने आपल्याला निवडून घेतले....

आता, येथेच जेथे मंडळी वाईट रीतीने डळमळीत होते.

त्या प्रमाणे त्याने आपल्याला निवडून घेतले....

कोणामध्ये? ख्रिस्तामध्ये.

21 आता आपण शोधले की, पाठी उत्पत्ती आणि प्रकटीकरणामध्ये, प्रकटीकरण १७:८, की त्याने आपल्याला जगाच्या स्थापनेपूर्वी ख्रिस्तामध्ये निवडले आहे. आता, शब्द.... मला पुढचे वाचू द्या.

... जगाच्या स्थापनेपूर्वी, की आपण त्याच्या समक्षतेत पवित्र व निर्दोष असावे....

आपल्याला पूर्वनिर्धारित केले होते....

मला 'पूर्वनिर्धारित' या शब्दावर थांबायचे आहे. आता, पूर्वनिर्धारित असे, म्हणत नाही, "मी भाऊ नेविलला निवडीन, आणि मी भाऊ बिलरला निवडणार नाही." ते तसे नाही. ते देवाचे पूर्वज्ञान आहे ज्याला ठाऊक आहे कोणता योग्य असणार आणि कोणता योग्य नाही. तेव्हा पूर्वज्ञानाद्वारे - देवाला ठाऊक होते तो काय करावयास जाणार होता - त्याने, त्याच्या पूर्वज्ञानाद्वारे, पूर्वनिर्धारित केले, त्या सर्व गोष्टी एकत्र मिळून त्यांच्यासाठी कल्याणकारक होतील जे देवाला प्रेम करतात असे करण्यासाठी; की तो, येणाऱ्या युगात, एकामध्ये सर्व गोष्टी एकत्र आणील, जो ख्रिस्त येशू आहे.

22 मला तुमच्यासाठी येथे लहानसे उदाहरण देऊ द्या. ते चांगले आहे. आपण मागे उत्पत्तीमध्ये जातो (मी विश्वास करतो मी त्या रात्री यावर थोडेसे बोललो, किंवा त्यावर प्रहार केला), पहिला अध्याय, १:२६. जेव्हा देवाने त्याचे नाव उच्चारले "परमेश्वर देव," ते "एल, एला, एलोहीम" या शब्दात आहे, ज्याचा अर्थ स्वअस्तित्व असा. तेथे तो स्वतः सोडून काहीही अस्तित्वात नव्हते. तेथे हवा नव्हती, तेथे प्रकाश नव्हता, तेथे तारे नव्हते, तेथे जग नव्हते, तेथे काहीही नव्हते. तो केवळ देव, आणि फक्त देव होता - एल, एला, एलोहीम. आता, त्याने हे बनविले.

23 त्याच्या आतमध्ये गुण होते, त्याचा अर्थ म्हणजे तो.... या महान एल, एला, एलोहीम मध्ये गुण किंवा एक.... तुम्हाला माहित आहे गुण काय आहे. किंवा मला ते अशा प्रकारे सांगू द्या, स्वभाव गुणधर्म होता. जेणेकरुन छोट्या मुलांना कळेल. आणि मी त्या छोट्यांपैकी एक आहे ज्यांना ते त्याप्रकारे कळायला हवे. त्याच्या आतमध्ये पिता होण्याचा स्वभाव गुणधर्म होता. परंतु तो स्व अस्तित्व आहे; तेथे त्याने पिता व्हावे असे काही एक नव्हते. आणि, आता, त्याच्या खोल आतमध्ये अजून काहीतरी होते - की तो देव होता. आणि देव ही उपासनेची वस्तू आहे. परंतु तो स्व अस्तित्व - एल, एला, एलोहीम होता - तेव्हा त्याची उपासना करण्यासाठी तेथे काही नव्हते. त्याच्या आतमध्ये, तो तारक होता, आणि तेथे काहीही नाशात गेले नव्हते ज्याला तारावे, पहा. त्याच्या आतमध्ये, तो एक आरोग्यदाता होता, पहा, परंतु तेथे आरोग्य देण्यासाठी काही आजारी नव्हते. तेथे कोणी आजारी नव्हते. आता तुम्हाला चित्र कळले? तेव्हा त्याचे गुण, त्याच्या स्वभाव गुणधर्माने जे काही आज आहे ते उत्पन्न केले.

24 काही लोक म्हणतात, "बरे, का देवाने अगदी सुरुवातीलाच ते थांबविले नाही?"

"तो निर्दय हृदयाचा क्रूर आहे," जो लेविस म्हणाला, तो एक ज्याने जो ... किंवा, जॅक कॉयला दोषी ठरविले, पहा. म्हणाला, "तो केवळ निर्दय हृदयाचा क्रूर आहे. तेथे देव म्हणून कोणती गोष्टच नाही. जर तेथे अशी गोष्ट असती, तो..." ओह, अगदी त्याला सर्व प्रकारच्या नावाने संबोधले, पहा. परंतु ते आहे अगदी कारण की त्याच्याकडे येथे खूप ज्ञान असेल, परंतु त्याच्याकडे खाली येथे काही नाही. आता, तेथेच जेथे ते

आहे, पहा.

हे वचन येथे सांगते, आणि त्याने ते गुप्त ठेवले. आणि ही रहस्ये गुप्त ठेवली गेली आहेत, आता लक्षात ठेवा पवित्र शास्त्र म्हणते जगाच्या स्थापनेपासून, देवाच्या पुत्राच्या प्रकट होण्याची वाट पाहत आहे, मंडळीला त्यांना सादर करायचे आहे. ओह, माझ्या! तुम्हाला समजले?

25 आता, मी माझ्या गोष्टीवर अगदी थोडा वेळ थांबेन, किंवा मी आणीन ... हे समजण्यासाठी मी माझ्या पुढच्या विचारावर जाईन. आता लक्षात ठेवा, मोशेच्या युगातून, मागे संदेष्ट्यांच्या युगांतून, मागे सर्व युगांतून, ते या नंतरच्या दिवसापर्यंत थांबले की या गोष्टी प्रदर्शित व्हाव्या, शास्त्रलेखांप्रमाणे (ते बरोबर आहे), कारण ते देवाच्या पुत्रांना प्रकट करणे आहे. का? नाशात गेलेल्यापासून ... पिरॅमिड प्रमाणे शेवटी, जसे मी म्हणालो आहे, निकट, निकट, निकट बांधणे.

26 जसे मी वारंवार हा उदगार काढला आहे आणि म्हणालो, देवाने तीन पवित्र शास्त्र बनविली. पहिले, ते त्याने आकाशात ठेवले - राशीचक्र. कधी तुम्ही राशीचक्र पाहिले आहे का? राशीचक्रातील पहिले चित्र काय आहे? कुमारी. राशीचक्रातील शेवटचे चित्र काय आहे? लिओ सिंह. तो प्रथम कुमारीद्वारे आला, तो दुसऱ्या वेळेस यहूदा वंशाचा सिंह म्हणून येतो, पहा.

त्याने पुढचे पिरॅमिडमध्ये बनविले, हनोखाच्या दिवसात पाठी, जेव्हा त्यांनी पिरॅमिड बनविले. आणि त्यांनी त्यांची मोजणी केली (मी ते समजू शकत नाही) ... परंतु युद्धामध्ये, जेथे ते वाकतात आणि त्यांच्या गुडघ्यांवर जातात दीर्घकाळासाठी, आणि युद्धाचे अंतर मोजू शकतात. आता त्यांनी कुठे मोजले तुम्हाला ठाऊक आहे? राजाच्या दालनापर्यंत.

आणि जसे हे पिरॅमिड वर गेले.... आपण ते बांधू शकत नव्हते. त्या सर्वासह जे आज आपल्याकडे आहे, आपण ते बांधू शकत नव्हते.

27 ते सरळ अशाप्रकारे, बिंदूवर बांधले गेले आहे. आणि दगड.... शिखराचा दगड कधीच आढळला नाही. त्यांनी कधीही पिरॅमिडच्या शिखरावर टोपी घातली नव्हती. मला ठाऊक नाही तुम्हाला हे ठाऊक आहे किंवा नाही, इजिप्तच्या मोठ्या पिरॅमिडच्या, त्याच्या शिखरावर कधीच दगड नव्हता. का? शिखराच्या दगडाला नाकारले गेले होते. ख्रिस्त, प्रमुख दगड, पहा, नाकारला गेला.

परंतु जसे आपण लुथर युगातून, बॅप्टिस्ट युग, मेथडिस्ट युग, पेन्टिकॉस्टल युगातून वाढतो, आपण सरळ शिखराच्या दगडापर्यंत वर आहोत आता, पहा, त्या शिखराच्या दगडासाठी उत्कंठेने वाट पाहत आहोत, ती इमारत पूर्ण होण्यासाठी, त्याने बसावे. "तुम्ही शास्त्रलेखात वाचले नाही, बांधणाऱ्यांनी नापसंत केलेला धोंडा [अर्थात, आपल्याला जाणीव आहे की ते शलमोनाच्या मंदिराकरिता बोलले गेले होते.], परंतु नाकारलेला धोंडा मुख्य कोनशिला झाला आहे...?"

परंतु मी हे केवळ तुम्हाला चित्र स्पष्ट होण्यासाठी सांगत आहे. आता, आणि पवित्र शास्त्रात, आपण शेवटच्या दिवसात राहत आहोत, पिरॅमिडच्या शिखरावर, राशिचक्रामधील विरुद्ध मत्स्याच्या कर्क युगात, सिंहाच्या आगमनाच्या समयात, शिखराच्या धोंड्यामध्ये, आणि देवाच्या पुत्राच्या प्रकट होण्याच्या दिवसात, पवित्र शास्त्रामध्ये, पहा. पहा आपण कोठे आहोत? आपण प्रत्यक्ष अंतसमयात आहोत.

28 किती जणांनी या आठवड्यात वर्तमानपत्र वाचले आहे, काय ख्रुश्चेव्ह आणि ते म्हणाले? ओह, ते तयार आहेत; तसेच आपण देखील. आमेन. तयार. ते ठीक आहे, पहा. ओह, काय सौभाग्य, काय एक दिवस आहे! जर ख्रिस्ती जनांना केवळ या दिवसाची जाणीव होईल ज्यामध्ये आपण जगत आहोत. माझ्या!

या पुस्तकाचा लेखक ज्याने ते पाहिले, आणि शेवटच्या दिवसात ते कुठे प्रकट होईल ते पाहिले, त्याबद्दल तुम्ही काय विचार करता...? वाट पाहत आणि कण्हत आहे त्या देवाच्या मुलांना शेवटच्या दिवसात, पवित्र आत्म्याच्या सामर्थ्यामध्ये या युगाच्या शेवटी, उदयास येताना पाहण्यासाठी, जगाच्या स्थापनेपासून असलेली रहस्ये प्रकट करण्यासाठी, वर आणण्यासाठी....

29 आता परत "जगाच्या पायारंभामध्ये" जाऊया, प्रकटीकरण मिळण्यासाठी, हे पाहण्यासाठी की आपण बरोबर आहोत किंवा नाही. मी आशा करतो देवाला "पिता" संबोधण्याद्वारे मी स्वतःला अधार्मिक करीत नाही, परंतु मला ते तशा प्रकारे म्हणायचे आहे जेणेकरुन तुम्ही ते समजाल. पिता. पित्याला काही मुले हवी होती, तेव्हा त्याने काय केले? तो म्हणाला, "तेथे दूत असू देत." आणि ते त्याच्या सभोवती आले. ओह, ते चांगले आहे. त्यांनी त्याची उपासना केली. मग तो देव झाला, गुण. लक्षात आहे, तो एल (ए-ल), एला, इलोहीम, स्वतः अस्तित्वात असलेला असा होता, त्याला सोडून काही नव्हते. पहिली गोष्ट सभोवती आली ती दूत होते. मग, दूत उपासना सोडून अधिक काही करु शकत नव्हते. त्यांचा नाश होऊ शकत नव्हता, ते आजारी पडू शकत नव्हते - ते अमर्त्य अस्तित्व होते. तेव्हा तो त्याच्या आरोग्याचे सामर्थ्य दाखवू शकत नव्हता, तो त्याचे तारण प्रदर्शित करु शकत नव्हता. म्हणून मग, अगोदर.... आता....

30 मग त्यानंतर, तो म्हणाला, "आपण काहीतरी स्पर्शनीय असे बनवू." म्हणून त्याने पृथ्वी बनविली. आणि जेव्हा त्याने पृथ्वी बनविली, त्याने पृथ्वीवरील सर्व निर्मिती बनविली. आणि मग त्याने मानव बनविला. सर्वकाही जे पृथ्वीमधून आले, लहान बेडकापासून सुरुवात झाली, किंवा जेलीफिश, फक्त मासाचे स्वरुप पाण्यावर तरंगणारे, तेथून सुरुवात झाली; त्यापासून बेडूक आले, जो सर्वात खालच्या जातीचे जीवन आहे जे आपल्याला आढळते, ते दावा करितात, तो बेडूक आहे; उच्चस्तराचा मनुष्य प्राणी आहे. बेडकापासून पालीपर्यंत सुरुवात झाली, पालीपासून पुढे आणि पुढे आणि पुढे. आणि प्रत्येक समयी पवित्र आत्म्याने श्वास "फुंकला" (श्वास), परत जीवन आले; "व्हेव," मोठे जीवन. आणि पहिली गोष्ट, काहीतरी देवाच्या प्रतिमेत वर आले. तो मानव होता. कधीही काहीही बनविले नव्हते, बनविले नाही, पुढे बनविले जाणार नाही, काहीही मनुष्यापेक्षा उच्च स्तराचे बनविले जाणार नाही, कारण मनुष्य हा देवाच्या प्रतिमेत आहे, पहा. मग मनुष्य....

31 जेव्हा त्याने त्याचा पहिला मनुष्य बनविला.... आता, जेव्हा त्याने त्याचे देवदूत अस्तित्व बनविले.... त्याने मनुष्य बनविला, "त्याने त्यांना

नर आणि नारी असे बनविले," सर्वकाही एकाच व्यक्तीमध्ये. तो दोन्ही होता स्त्री आणि पुरुष, स्त्रीत्व आणि पुरुषत्व. जेव्हा त्याने आदामाला बनविले आणि त्याला शरीरात ठेवले.... लक्षात आहे, उत्पत्ती १ मध्ये, त्याने स्त्री आणि पुरुष बनविला; आणि उत्पत्ती २ मध्ये, तेथे अजूनही शेतीची मशागत करण्यास कोणी मनुष्य नव्हता, शारीरिक मनुष्य. कोणी मनुष्य नव्हता जो कसलातरी ताबा घेऊन, जमिनीची मशागत करील, परंतु तरीही तेथे त्याच्या प्रतिमेत मनुष्य होता. आणि देव हा [मंडळी म्हणते, "आत्मा"] आहे. ते बरोबर आहे, पहा. त्याने पहिला मनुष्य बनविला, "नर आणि नारी अशी ती त्याने बनविली."

आता, जेव्हा त्याने पहिला मनुष्य बनविला,

32 आता, लक्षात ठेवा, सर्वकाही त्याच्या मनामध्ये होते. आणि रविवारी रात्री मी त्यातून गेलो आहे. अभिव्यक्त केला गेलेला विचार हा शब्द आहे. देवाने विचार केला कसा तो देव होऊ शकत होता, त्याची कशी उपासना होऊ शकत होती, तो कसा आरोग्यदाता होऊ शकत होता, तो कसा तारक होऊ शकत होता; आणि त्याने शब्द बोलताच, ते सर्वकाळासाठी समाप्त झाले. ओह, जर हे देवाचे पुत्र आता केवळ त्या शब्दाचा ताबा घेतील अशा प्रकारे! जेव्हा देव शब्द बोलतो, ते संपूर्णतः - समाप्त होते. तो कदाचित थांबला असेल.... कालगणना म्हणते की, किंवा पुरातत्व शास्त्रज्ञ आणि सर्व, ते दावा करितात की कदाचित जग हे दशलक्ष आणि दशलक्ष आणि दश.... मला ठाऊक नाही, ते कदाचित खरब आणि खरब वर्षाचे असेल. मला ठाऊक नाही ते किती वर्षाचे होते. देव समयात वास करीत नाही. जेव्हा तो ते बोलला त्या वेळेपासून त्याच्याकडे एकही मिनिट कमी नाही. तो अजूनही देव आहे. त्याच्याकडे समय असे काही नाही.

मला ते कधीही माहिती नव्हते त्या रात्रीपर्यंत, त्या सकाळपर्यंत, खरंतर. अनंत - काल नाही, उद्या नाही, ते सर्व आता आहे. तुम्ही कधी त्या शब्दाचे निरीक्षण केले "मी आहे"? "मी होतो" किंवा "मी असणार" नाही. तो अनंत आहे - "मी आहे," पहा. नेहमी, "मी आहे."

33 आता, परंतु त्याला गोष्टी समयात ठेवायच्या होत्या. त्याला काहीतरी जे उपासना करील असे बनवायचे होते, म्हणून त्याच्या गुणाने हे उत्पन्न केले. मग त्याने मनुष्य बनविला. मग, या माणसामध्ये.... तो एकाकी दिसत होता, म्हणून, आता, आता त्याचे महान मन दर्शविण्यासाठी, जे त्याच्याकडे ख्रिस्त आणि मंडळीचे चित्र होते, त्याने - वेगळा मातीचा भाग घेऊन, स्त्री बनविली नाही - परंतु त्याने आदामाच्या भागातून एक फासळी काढून घेतली; आणि आदामाच्या आत्म्यातून स्त्रीत्वाचा आत्मा घेतला, आणि तो या फासळीत टाकला. जेव्हा तुम्ही पुरुषाला बायल्या सारखे वर्तन करताना पाहता, तेथे काहीतरी चुकीचे असते. आणि तुम्ही जेव्हा स्त्रीला पाहता जिला पुरुषाप्रमाणे वर्तन करायचे असते, तेथे काहीतरी चुकीचे आहे, पहा. तेथे काहीतरी चुकीचे आहे. ते सर्वस्व वेगळे आत्मे आहेत. परंतु, एकत्र, ते एक शरीर बनतात. "हे दोघे एक आहेत." तेव्हा त्याने स्त्री आणि पुरुष बनविला, आणि ते कधीही वृद्ध होणार नव्हते, कधीही मरणार नव्हते, कधीही केस पिकणार नव्हते, कधीही.... त्यांनी खाल्ले, त्यांनी प्यायले, ते झोपले, अगदी तसेच जसे आपण करतो, परंतु त्यांना कधीही ठाऊक नव्हते पाप काय होते.

34 आता अगदी येथेच मी कधीतरी सर्पाच्या बीजाच्या दुसऱ्या धड्यासाठी बगल देतो. ज्याला, त्यांनी मला ते पाठी घेण्यास सांगितले आहे. मला पाहू दे कोणीतरी येऊन, मला भिन्न प्रकारे काहीतरी दाखवू दे. तेच काय ते मला जाणून घ्यायचे आहे, पहा.

आता, परंतु मग या सर्वानंतर, तेव्हा जेव्हा पापाचा आतमध्ये प्रवेश झाला, काय घडले?

वर पलीकडे, दशलक्ष शेकडो, दशलक्ष मैलावर, तेथे एवढे मोठे अंतराळ आहे, आणि ते सिद्ध आगापे प्रेम आहे. प्रत्येक वेळी तुम्ही एक पाऊल या बाजूला टाकता, ती एका इंचाने अरुंद होते. आणि तुम्हाला ठाऊक आहे किती कमी अवधी असेल त्याला पृथ्वीवर येण्यासाठी. ती सावलीच्या सावलीची सावली आहे. तेच काय ते तुमच्याकडे आहे, तेच काय ते माझ्याकडे आहे: आगापे प्रेमाच्या सावलीच्या सावलीची सावली.

35 तेथे तुमच्यामध्ये काहीतरी आहे, तेथे वीस वर्ष वय पार केलेल्या येथील प्रत्येक स्त्रीमध्ये काहीतरी आहे, येथील वीस वर्ष पार केलेल्या प्रत्येक पुरुषामध्ये काहीतरी आहे, जे तसेच राहण्याची उत्कट इच्छा करते. तुमच्याकडे केवळ पाच वर्ष आहेत, ती पंधरा ते वीस वर्षाची आहे. वीस नंतर तुम्ही मृत होऊ लागता. परंतु, पंधरापासून ... तुम्ही केवळ तेथपर्यंत पौगंडा अवस्थेत असता. आणि मग तुम्ही वीसपर्यंत प्रौढ होता. आणि वीस नंतर, ओह, तुम्ही म्हणता, "मी अगदी पुरुषाइतका चांगला आहे." तुम्ही केवळ ते म्हणता, परंतु तुम्ही नाहीत. तुम्ही मरत आहात, आणि तुम्ही जळत आहात, काही फरक पडत नाही तुम्ही काय करता. देवाने तुम्हाला त्या वयापर्यंत बनविले आहे, परंतु मग तुम्ही मरणार आहात. आता काय घडले? आता तुमची मरण्याची सुरुवात होते, परंतु तेथे काहीतरी तुमच्यामध्ये आहे जे म्हणते, "मला परत अठरा वर्षाचे व्हायचे आहे."

36 आता मला तुम्हाला काहीतरी विचारायचे आहे. काय जर तुम्ही पाचशे वर्षांपूर्वी जन्मला असता, आणि आजपर्यंत तुम्ही अठरा वर्षाचे राहिला असता? पाचशे वर्षांपूर्वीच्या तुमच्या कल्पनांनी, जर तुम्ही प्राचीन नसता का! (यात्रेकरु पूर्वज जेव्हा केव्हा येथे आले त्या अगोदर.) आणि तू तरुण स्त्री होतीस त्या प्रकारच्या कल्पनेने, का, तू चांगली असतीस अगदी पुढे जाण्यासाठी आणि वृद्ध झाली आणि पाचशे वर्ष जगली. पहा, तेथे काहीतरी चुकीचे आहे.

तुम्ही म्हणता, "बरे, आता प्रत्यक्ष मला खूप चांगले वाटते, भाऊ ब्रॅन्हम. ओह, मी अठरा वर्षाची आहे, मी सोळा वर्षाची आहे, मला चांगले वाटते." प्रिय, मला तुला काहीतरी सांगू दे. तुला कसे माहित की तुझी आई या वेळेस जिवंत आहे, जर ती या मंडळीत नाही? तुला कसे ठाऊक की तुझा प्रियकर अगदी काही मिनिटाअगोदर ठार झाला नसेल, किंवा तुझी प्रेयसी? तुला कसे ठाऊक असेल की सकाळी तुझ्या घरात प्रेत नसेल? तुला कसे ठाऊक आज रात्री तू या मंडळीतून जिवंत बाहेर जाशील? ती इतकी अनिश्चितता आहे. तेथे काहीच निश्चित नाही. जर तुम्ही पंधरा, बारा, एकोणीस, पंच्याहत्तर, किंवा नव्वद आहात, सर्वकाही अनिश्चित आहे. तुम्हाला ठाऊक नाही तुम्ही कुठे उभे आहात. परंतु तरीही तुम्ही पंधरा, अठरामध्ये जाण्यास उत्कंठित आहात. तसे तुम्हाला काय करते?

37 आता, जर तुम्ही अठरामध्ये परत जाता आणि तेथे राहता, आणि कधीच आजारी पडत नाही आणि कधीच.... तुमच्याबरोबर इतर लोक असावयास हवेत, कारण तुम्ही त्यांच्यापेक्षा वाढाल, पहा. लोक दुसऱ्या युगात जातील आणि तुम्ही पुरातन व्हाल. तुम्ही त्यांच्याबरोबर वृद्ध व्हाल त्यापेक्षा वाईट स्थिती तुमची होईल जर तुम्ही तसे असाल. परंतु तेथे काहीतरी आहे जे तुम्हाला तेथे असण्यासाठी बोलावीत आहे. ते ते लहानसे आगापे प्रेम आहे, जी लहानशी सावली आहे जी तुम्हाला.... येथल्यापेक्षा काहीतरी उंच बनविते.

38 आता, त्या रात्री ... किंवा, त्या सकाळी, सात वाजता, जेव्हा पवित्र आत्म्याने, त्याच्या चांगुलपणाने आणि कृपेद्वारे, मला या देहातून नेले, मी विश्वास करतो (मी विश्वास करतो; होय किंवा नाही, मला माहित नाही.), आणि मी त्या भूमीमध्ये प्रवेश केला आणि त्या लोकांना पाहिले, आणि ते सर्व तरुण होते. आणि मी सर्वात सुंदर लोक पाहिले जे कधी मी माझ्या जीवनात पाहिले असतील. आणि तो मला म्हणाला, "त्यातील काही नव्वद वर्ष वयाचे होते. ते तुझ्याद्वारे परिवर्तन झालेले आहेत. आश्चर्य नाही ते आरोळी मारतात, 'माझ्या भावा! माझ्या भावा!'"

आता, ते स्वर्गीय शरीर आहे, जे.... जेव्हा आपण मरतो आपण कल्पित गोष्ट होत नाही; आपण शरीर होतो. जर आपण, प्रत्येकजण, मरु, जर अणुबॉम्बने आपल्याला या मिनिटाला स्फोटाने उडविले, आतापासून पाच मिनिटात आपण एकमेकांना हात मिळवीत असू, आणि एकमेकांना मिठी मारु, आणि आरोळी मारु आणि उत्साहात असू, आणि देवाला गौरवू! होय, महाशय. आणि भाऊ आणि बहीण स्पेन्सर येथे बसलेले आहेत, मी अंदाज करतो येथील सर्वात वृद्ध जोडपे आहे, ते अठरा, वीस वर्ष वयाचे असतील. भाऊ नेविल अगदी तरुण मुलगा असेल, आणि मी तरुण मुलगा असेन, आणि आपण सर्व अगदी.... ते तंतोतंत सत्य आहे. "जर पृथ्वीवरील मंडपरुपी गृह मोडून टाकण्यात आले, आमच्यासाठी एक अगोदरच वाट पाहत आहे."

39 जेव्हा लहानसे बाळ, नैसर्गिक प्रसूतीद्वारे, त्याच्या आईकडून येते, त्याचे लहानसे शरीर पिळवटते, आणि पाय उड्या मारतात, आणि इत्यादी. तुम्ही तरुण स्त्रिया, या अभिव्यक्तीला माफ करा. परंतु, जेव्हा ते करते, त्याचे जीवनाचे स्नायू हिसके देतात. परंतु जेव्हा ते पृथ्वीवर येते, पहिली गोष्ट, ते त्याचा श्वास पकडते, आणि तेथे त्या बाळामध्ये निसर्गाचे आत्मिक शरीर असते जे सरळ तेव्हाच येते. त्याला एकटे सोडा. ते त्याचे लहानसे डोके घेते आणि त्याच्या आईच्या वक्षस्थळाला शोधू लागते, स्तनपान करु लागते. जर त्याने तसे केले नाही, अगदी दूध देखील खाली येणार नाही.

तुम्ही कधी वासराला जन्मताना पाहिले आहे, जेवढ्या लवकर त्याला त्याच्या पायावर उभे राहण्याची पुरेशी शक्ती मिळते? त्याला ते कोण सांगते? ते सरळ त्याच्या आईजवळ जाते, सभोवती शोधू लागते आणि स्तनपान करु लागते. ओह, होय.

40 कारण जेव्हा पार्थिव शरीर येथे आणले जाते, तेथे त्याच्यासाठी आत्मिक शरीर तयार असते. आणि जसे हे.... ओह, हालेलूया! "आणि जर हे पृथ्वीवरील मंडपरुपी गृह मोडण्यात आले, तेथे एक पलीकडे वाट पाहत आहे." अगदी लागलीच जेव्हा आपण यातून बाहेर पडतो, आपण त्यामध्ये प्रवेश करतो. एक ज्याला थंड प्यावयाचे नाही, ज्याला पाणी पिण्याची गरज नाही; एक जे खात नाही, ते पृथ्वीच्या मातीचे नाही. परंतु ते अगदी वास्तविक आहे, आणि ज्याला स्पर्श करु शकतो आणि हात मिळवू शकतो, आणि अगदी प्रेम, आणि सर्वकाही सिद्ध. आणि ते शरीर पलीकडे वाट पाहत आहे. ते याचा भाग आहे.

तेथे त्याचे तीन आहेत.

41 अगदी सरळ वेदीवर तुम्ही तुमचे अनंत जीवन सुरु करता. येथेच जेथे तुम्ही अनंतता सुरु करता. ओह! तुम्ही अनंत जीवन अगदी येथे सुरु करता. मग तुम्ही नव्याने जन्मलेले, देवाचे पुत्र होता. आणि मग जेव्हा तुम्ही मरता, तुम्ही सुरुवात.... जेव्हा या शरीरामध्ये तुम्हाला मृत्यूचा प्रहार होतो आणि हृदयाची स्पंदने बंद होतात, आणि मर्त्य चाक स्तब्ध होते, ती लहानशी सावली जी सावलीची सावली असते, एका क्षणात ती सावलीची सावली होते. मग पुढे ती सावली होते; आणि पुढे, ती लहानसा ओहळ होतो; मग पुढे, ती खाडी होते; मग पुढे, ती नदी होते; आणि पुढे, ती समुद्र बनते; आणि थोड्या वेळाने तुम्ही तुमच्या प्रियजनांच्या उपस्थितीत उभे असता - पलीकडे उभे असता, स्वर्गीय शरीर परिधान केलेले, की तुम्ही एकमेकांना ओळखता, एकमेकांना प्रेम करता, तुम्ही परत तरुण पुरुष व तरुण स्त्री मध्ये बदलता. तंतोतंत बरोबर आहे. ते तेथे प्रभू येशूच्या आगमनापर्यंत वाट पाहतील. आणि कधीतरी ते गौरवी शरीर त्याचे.... आता, लक्षात ठेवा, ते स्वर्गीय शरीर आहे, गौरवी नाही - स्वर्गीय शरीर. आणि कधीतरी ते स्वर्गीय शरीर येशूबरोबर स्वर्ग सोडील.

42 "कारण मी तुम्हाला सांगतो [२ थेसल्लनीकाकरांस, पाचवा अध्याय, किंवा १ थेसल्लनीकाकरांस, पाचवा अध्याय, ते किंवा हे] मी तुम्हाला म्हणतो, झोपी गेलेल्या लोकांविषयी, तुम्ही अजाण नसावे, बंधूंनो, अशी आमची इच्छा आहे, ह्यासाठी की ज्यांना आशाच नाही, अशा बाकीच्या लोकांसारखा तुम्ही खेद करु नये. कारण येशू मरण पावला व तिसऱ्या दिवशी पुन्हा उठला असा जर आपला विश्वास आहे, तर त्या प्रमाणे येशूच्याद्वारे जे झोपी गेले आहेत त्यांना देव त्याच्याबरोबर आणील. प्रभूच्या वचनावरुन आम्ही हे तुम्हाला सांगतो, की प्रभूचे येणे होईपर्यंत जे आपण जिवंत असे उरु, ते आपण झोपी गेलेल्यांच्या आघाडीस [किंवा अडथळा, चांगला शब्द आहे] जाणारच नाही. कारण परमेश्वराच्या तुतारीचा नाद होईल, आणि ख्रिस्तामध्ये झोपी गेलेले प्रथम उठतील. [हे स्वर्गीय देह खाली येतील आणि पार्थिव देह परिधान करतील, गौरवी शरीरे.] आणि आपण जिवंत, उरलेले त्यांच्याबरोबर, प्रभूला सामोरे होण्यासाठी, मेघारुढ असे अंतराळात घेतले जाऊ, क्षणात डोळ्याचे पाते लवते न लवते तोच.

43 "मी आपल्या पित्याच्या राज्यात तुम्हाबरोबर नवा द्राक्षारस पिईपर्यंत किंवा खाईपर्यंत यापुढे पिणार नाही किंवा खाणार नाही," लग्नाची मेजवानी. कारण साडेतीन वर्ष, ख्रिस्तविरोधी त्याची सत्ता संपवितो, अखंड जग नाश केले जाते, यहुद्यांना पाचारण केले गेले, योसेफ स्वतःला परराष्ट्रीयांना ज्ञात करुन देतो ... किंवा, यहुद्यांना. लक्षात आहे, जेव्हा योसेफाने आपल्या भावांना ओळख दिली, तेथे एकही परराष्ट्रीय उपस्थित नव्हता. जेव्हा त्याने पाठविले.... तुम्हाला गोष्ट ठाऊक आहे. योसेफ - प्रत्येक गोष्टीत, ख्रिस्ताचे सिद्ध प्रतीक. आणि जेव्हा योसेफाने आपल्या

भावांना बोलाविले, आणि ते खाली आले, आणि त्याने पाहिले आणि लहान बन्यामीनाला बघितले.... आणि त्याने त्यांना तेथे पाहिले, आणि मग तो.... ते म्हणाले, "का, हा माणूस.... आपण आपल्या भावाला, योसेफाला, ठार करावयास नको होते." (यहुदी, आता ते पाहत आहेत की त्यांनी चूक केली आहे, जेव्हा ख्रिस्त ... जेव्हा तो त्यांना त्याची ओळख देत होता.) आणि योसेफ इतका गहिवरला होता, की त्याला, जवळ जवळ, रडावे लागले, म्हणून त्याने त्याच्या पत्नीला आणि त्याच्या मुलांना, आणि सर्व अंगरक्षकांना आणि सर्वकाही काढले, आणि त्यांना राजवाड्यात पाठविले. तंतोतंत बरोबर. आणि मग केवळ यहुद्यांच्या उपस्थितीत, तो म्हणाला, "मी योसेफ आहे, तुमचा भाऊ. मी तुमचा भाऊ आहे." आणि तेव्हा ते पडले आणि थरथरु लागले, म्हणाले, "आता आम्हाला माहित आहे आम्हाला मिळेल, कारण की आम्ही आमच्या भावाला ठार केले. आम्ही म्हणालो आम्ही आमच्या भावाला ठार केले, आता हा तो महान राजा आहे."

तो म्हणाला, "देवाने ते उद्देशाने केले, जीवन वाचविण्यासाठी." तेच तंतोतंत कारण आहे की देवाने ते केले - आपण परराष्ट्रीयांना वाचविण्यासाठी. परंतु परराष्ट्रीय राजवाड्यात होते. हालेलूया! त्याच्या भावांनी नाकारल्यामुळे, योसेफाने वधू केली; आणि ती वधू परराष्ट्रीय होती, यहुदी नव्हती. ठीक आहे.

44 आता, आता आपण कोठे आहोत? आपण हे गौरवी शरीर परिधान केल्यानंतर, आणि जे महान युग येणार आहे, जेव्हा हे गौरवी शरीर ... ह्या स्वर्गीय शरीराला गौरवी शरीर बनविले जाईल. आता मला काय म्हणायचे आहे ते तुम्हाला कळले? मग मी चालत जाऊ शकतो आणि म्हणेन, "भाऊ नेविल." मला तुम्हाला अगदी लहानसे उदाहरण देऊ द्या. मी म्हणेन, "भाऊ ह्युमस, या सकाळी आपण पित्याकडे जाऊया." तो देव आहे. आता आपल्याला तो ठाऊक आहे. तो तारक आहे, तो आरोग्यदाता आहे.

तेथे पापाची निर्मिती अशी कोणती गोष्टच नव्हती. (ते चांगल्या प्रकारे खाली जात नाही, ते जाते?) पाप हे निर्मिती नाही. नाही, महाशय! पाप ही विकृती आहे. तेथे केवळ एकच निर्माता आहे - तो देव आहे. पाप हे विकृत केलेले नीतिमत्व आहे. व्यभिचार काय आहे? नीतिमत्व विकृत केले गेले आहे. खोटे काय आहे? सत्य चुकीचे दर्शविलेले आहे. निश्चित. शापाचा शब्द काय आहे? आशिर्वादाऐवजी तो देवाचा आशीर्वाद शापाच्या शब्दात वळविला गेला आहे देवाकडे. पाप ही निर्मिती नाही. पाप ही विकृती आहे. तेव्हा, सैतान पापाची निर्मिती करु शकत नाही; तो केवळ देवाने जे काही निर्माण केले आहे ते विकृत करतो. ते तंतोतंत बरोबर आहे. मृत्यू हा केवळ जीवनाची विकृती आहे.

45 आता, याकडे लक्ष द्या. मग मी चालत जातो, आणि मी म्हणतो, "भाऊ ह्युमस, तू आणि मी, आणि भाऊ बिलर आणि भावातील काही...." आपण वर देव पित्याकडे जाऊया, आणि ... म्हणू, "थोडासा प्रवास करुया. तुम्हा मुलांना डोंगर आवडत असत जेव्हा तुम्ही...."

"होय, आम्हाला नक्कीच आवडत."

"ओह, तेथे त्या नवीन जगामध्ये काही दशलक्ष मैलांपर्यंत ते आहेत. तेथे बाहेर जा, त्यांच्यावर फिरा."

"मला ... सूर्य प्रत्येक दिवशी. वर उंचावर ये, मी तुझे ऐकीन. ते बोलत असतानाच, मी ऐकीन." यशया ६६. ते बरोबर आहे.

46 आणि तुम्हाला माहित आहे, मी त्यातून तेथे चालत आहे, आम्ही सर्व त्यातून फक्त सुमारे पाचशे वर्षासाठी चालत आहोत, फक्त लहानसा प्रवास, दशलक्ष, त्याने काही फरक पडत नाही, पहा. आता ते वेडगळपणासारखे वाटते, परंतु ते सत्य आहे. पहा, ते सत्य आहे, कारण तेथे समय नाही. ती अनंतता आहे. आणि जेव्हा मी तेथे बाहेर जातो, मी तेथे त्यामधून चालतो, आणि तुम्हाला ठाऊक आहे की कोणाला भेटतो तेथे? मी म्हणतो, "बरे, जर ती तेथे बहीण जॉर्जी ब्रूस नाही! का, बहीण जॉर्जी, तुला पाहून फार काळ लोटला." असे दिसते जसे काही ती नेहमी.... ती कदाचित दहा दशलक्ष वर्ष वयाची असेल, परंतु अगदी तेवढीच तरुण जेवढी कधी ती होती. ती कोणाच्या तरी पाठीवर खाजवीत होती, आणि मी तेथे पाहिले, तो चित्ता होता, सिंह.

मी म्हणालो, "चित्या, तू या सकाळी कसा आहेस?" मांजरी सारखा म्याव करतो.

"ओह, मी तेथे खाली बहिणीमधील काहींशी बोलत होतो त्या मोठ्या फुला सभोवती. आम्ही तेथे सुमारे पाचशे वर्षापर्यंत, सभोवार पाहत होतो, पहा." आता, ते वेडगळपणासारखे वाटते, परंतु ते सत्य आहे. ते तंतोतंत आहे. त्याच मार्गाने देवाने त्याची संकल्पना केली होती.

47 "बहीण जॉर्जी, देव तुझ्या हृदयाला आशीर्वादित करो, कोणताही अपाय येऊ शकत नाही. अजिबात काहीही नाही."

संध्याकाळच्या समयी आपण डोंगराच्या माथ्यावर जाऊ, आणि म्हणू, "ओ देव पित्या, मी एकदा हरवलो होतो. ओह, मी एकदा पापाच्या दलदलीत होतो, देव पित्या, आणि तू मला वाचविलेस."

का, लोक ज्यांनी ते व्यक्त करण्याचा प्रयत्न केला ते वेडे झाले. बरे, तो मनुष्य ज्याने त्याचे शेवटचे पद लिहिले हे "देवाचे प्रेम," ते वेड्यांच्या ... दवाखान्याच्या भिंतीवर लिहिले गेले, ज्याने देवाच्या प्रेमाला व्यक्त करण्याचा प्रयत्न केला, कसे की तो पाप्यांना वाचविण्यासाठी खाली झुकला, आणि ते त्याने कसे केले, त्याचे प्रेम जे तुम्हाला वाचविण्यासाठी खाली आले आणि मी.... उपासनेबद्दल बोलता, दूतांना त्याबद्दल काही एक ठाऊक नाही! उपासना ... दूताला केवळ ठाऊक आहे तो तेथे उभा राहतो आणि त्याचे पंख मागे पुढे हलवितो, आणि चौफेर, "हालेलूया! हालेलूया!" परंतु, ओह, दया! जेव्हा हे समजण्याची वेळ येते की मी हरवलो होतो आणि आता सापडलो आहे; मी मेलो होतो, मी परत जिवंत झालो! हे देवा, मी पाप होतो, मी दलदल होतो, मी खाली उकिरड्यावर होतो!

48 येथे हेच काय ते उत्तम आहे जे जीवन तुम्हाला देऊ शकते. कधी तुम्ही येथे खाली कोलगेटच्या उकिरड्यावर गेलात का? ती सर्वात दुर्गंधिमय जागा आहे ज्यावर कधी मी गेलो आहे. तो जुना धूर अगदी मला वासानेच आजारी करतो. सर्व त्या जुन्या धुरामध्ये पडून राहणे, इतके

आजारीपणासारखे आहे की तुमचे पोट मधून बाहेर ढवळून निघते (एरंडेल तेल प्यायल्यानंतर, पहा, तुम्हाला इतके अस्वस्थ आजारी वाटते जेवढे वाटू शकते), आणि तुमच्यावरुन उंदीर सर्वत्र धावत असतात, तुम्हाला खाण्याचा प्रयत्न करतात - आणि ते जीवनाचे सर्वात चांगले असे आहे. आणि मग कोणीतरी तुमच्यापर्यंत पोहोचते आणि तुम्हाला वर उचलते (आणि तुम्ही वास्तविक वृद्ध आहात आणि स्वतःला सहाय्य करु शकत नाही), आणि सहज तुम्हाला वर उचलतो आणि तुम्हाला अठरा वर्षाच्या मुलामध्ये बदलतो, तुम्हाला डोंगराच्या माथ्यावर बसवितो, प्रत्यक्ष आरोग्याच्या बहरात. माझ्या, ताज्या हवेच्या चांगल्या श्वासांमध्ये तशा प्रकारे, चांगले थंडगार पिण्याचे पाणी. तुम्हाला परत मागे त्या उकिरड्यावर जावेसे वाटेल? कधीही नाही, कधीही नाही, कधीही नाही! परत त्या उकिरड्यावर कधीही जाऊ नका.

49 आता, मित्रांनो, तेच काय ते ते आहे. तोच काय तो दृष्टांत (किंवा रुपांतर, जे काही असेल, दृष्टांत - मी दृष्टांत म्हणेन, कारण मला भीती वाटते की रुपांतर म्हणणे कोणालातरी दुखावेल), तेच काय ते ते होते. आता, तेथे जेव्हा देव ... देवाने त्याच्याकडे पुत्र आणि कन्या आणण्यासाठी काय केले. आता, हे कोण लोक आहेत? कसे काय ते कधी.... हे श्रेय मिळविण्यासाठी या लोकांनी काय केले? त्यांनी ते कधी कसे केले? देवाने, प्रारंभी, दूताला बनविण्याअगोदर.... किती जणांना ठाऊक आहे तो अमर्याद आहे?

आता, तुम्ही त्रैक्यवादी भाऊ, मला तुम्हाला दुखवायचे नाही, परंतु देवाच्या चांगल्या शब्दाच्या नावात तुम्ही कसे काय येशूला स्वतः देवापासून विभक्त व्यक्ती म्हणून ठेवू शकता? जर येशूने दुसऱ्या व्यक्तीला घेतले असते आणि त्याला जाऊन, त्या व्यक्तीला येथे उद्धारण्यासाठी मरावयास लावले असते, तो अन्यायी अस्तित्व असता. तेथे केवळ एकच मार्ग आहे ज्याने देव ते कधी करु शकला, ते म्हणजे स्वतः ती जागा घेणे! आणि देव देहात आला की त्याने मृत्यूचे दुःख चाखावे, आपल्यापासून नांगी आणि मृत्यू दूर करावा, की आपण त्याच्या स्वतःच्या... उद्धारले जावे. त्याच कारणामुळे त्याची अशा प्रकारे उपासना केली जाईल. येशू मनुष्य होता, निश्चित तो होता. तो मनुष्य होता, मनुष्य[m-a-n], कुमारी मरीयेपासून जन्मलेला. परंतु त्याच्यामध्ये जो आत्मा होता तो अमर्याद देव होता. त्याच्यामध्ये देवपणाची सर्व पूर्णतः मूर्तीमान वसते. तो यहोवा यिरे होता, तो यहोवा राफा होता, तो यहोवा मनश्शे होता, तो यहोवा आपली ढाल होता, आपले कवच, आपला आरोग्य दाता; तो अल्फा, ओमेगा, आदी आणि अंत होता; तो पहिला, शेवटचा होता; तो जो होता, जो आहे, आणि जो येणार आहे; दाविदाचे मूळ व अंकुर, पहाटेचा तारा. का, तो सर्वात सर्वकाही होता. त्याच्यामध्ये देवपणाची सर्व पूर्णतः मूर्तीमान वसते.

50 आणि मृत्यूकडे नेहमीच नांगी होती, ज्याने तो लोकांना डंख मारी, "आहा," सैतान म्हणतो, "मी तुला घेतले, कारण तू माझे ऐकलेस. तुला डंख मारला! मी तुला कबरेत ठेवीन. ते मेंढराचे रक्त तुम्हाला काहीच सहाय्य करु शकत नाही. ते केवळ प्राण्याचे रक्त आहे." देवाला, त्याच्या शहाणपणामध्ये, ठाऊक होते की तेथे कोकरा येत आहे, ज्याचा जगाच्या स्थापनेपासून वध करण्यात आला आहे. होय, महाशय. आणि तो त्या समयापर्यंत थांबला, समयाची पूर्णता येण्यासाठी.

परंतु एक दिवस जेव्हा तो कोकरा आला, हा मनुष्य, सैतान देखील मूर्ख बनला. त्याने त्याला सभोवार पाहिले. तो म्हणाला, "जर तू देवाचा पुत्र असशील, हे कर. जर तू देवाचा पुत्र असशील, चमत्कार सादर कर आणि तुला ते करताना मला पाहू दे. मला तू ते करताना पाहू दे. (हू-हू, मी त्याच्या तोंडावर कपडा बांधीन.) तुला मारिन. जर तू संदेष्टा असशील, आम्हाला सांग तुला कोणी मारले. हम्म! मी खरे मानीत नाही तू तो मनुष्य आहेस. जर तू असशील, थेट आम्हाला सांग तू आहेस. [पहा, सर्व अशा प्रकारे.] ओह, आम्हाला सांग तू आहेस!" त्याने त्याचे तोंड उघडले नाही. ओह! ओह, त्याने त्याच्या डोळ्यावर मग लोकर पांघरली होती का!

51 त्याने शिष्यांच्या सभोवार पाहिले, आणि म्हणाला, "मी माझ्या पित्याशी बोलू शकतो आणि तो देवदूतांच्या बारा सैन्याला पाठविल." तुम्हाला ठाऊक आहे, पिलाताने ते ऐकले नाही.

"जर तू असशील.... जर तू असशील.... ओह, तो तो नाही. का, त्याच्याकडे पहा रक्तस्त्राव होत आहे. हे, तुमच्यातील काही सैनिकांनी तेथे जा आणि त्याच्या तोंडावर थुंका. [थुंकले, त्याची थट्टा केली, त्याच्या चेहऱ्यावरील दाढी खेचली.] ओह, तो नाही ... नाही, तो तो नाही! मी त्याच्यामध्ये माझी नांगी नांगरीन, मुला. मी येथे वर त्याला घेईन. आता मला तू मिळालास!"

जेव्हा तो तेथे रडत होता, "एली! एली! माझ्या देवा! माझ्या देवा! [तो मनुष्य होता.] तू माझा त्याग का केलास?"

गेथशेमानीच्या बागेत, अभिषेकाने त्याला सोडले, तुम्हाला ठाऊक आहे. त्याला पापी म्हणून मरावे लागले. तो पाप म्हणून मेला - तुम्हाला ते ठाऊक आहे. त्याची पापे नाहीत, परंतु तुमची आणि माझी. तेथेच जेथे ते प्रेम आत येते, कशी त्याने माझी घेतली! ओह, हालेलूया, कशी त्याने माझी घेतली!

52 आणि तेथे तो होता. तो त्याचे मुख उघडू शकत नव्हता. नांगी म्हणाली, "तुम्हाला माहिती आहे, मी विश्वास करतो तो केवळ एक सामान्य मनुष्य होता. तो कुमारीद्वारे जन्मलेला नव्हता, तेव्हा मी माझी नांगी त्याच्यामध्ये नांगरीन."

येथे तो आला, त्याच्यामध्ये त्याच्या नांगीचा प्रहार केला, परंतु मुला, तो चुकीचा समय होता! त्या वेळेस त्याची नांगी बाहेर खेचली गेली. त्यानंतर तो अजून जास्त डंख मारु शकत नाही. त्याने त्याचा डंख तेथे सोडला. तिसऱ्या दिवशी उठला, आणि म्हणाला, "मी तो आहे जो मेला होता, आणि परत जिवंत झाला, आणि सदासर्वकाळ जिवंत आहे. माझ्याकडे मृत्यूच्या व अधोलोकाच्या किल्ल्या आहेत." होय, महाशय. तो कोण होता हे पाहण्यास तो चुकला. "आणि कारण की मी जिवंत आहे, तुम्ही देखील जिवंत राहाल. ते अजूनही दृश्यात आले नाही...."

53 एक दिवस, त्यानंतर तीन किंवा चार दिवसांनी, त्याचे पित्याकडे आरोहण झाल्यानंतर, परत आला, मग त्यांच्यातील काही म्हणाले, "ओह, तो भूत असला पाहिजे. तो ... काहीतरी भुतासारखे त्याच्याबाबतीत असावयास हवे. जेव्हा तुम्ही त्याला पाहिले, तुम्ही दृष्टांत पाहिला."

"नाही, तो वास्तविक येशू होता."

थोमा म्हणाला, "मला त्याचे हात आणि सर्वकाही पाहू द्या. मी तुम्हाला सांगेन जर तो आहे."

तो म्हणाला, "मी येथे आहे." म्हणाला, "तेथे तुमच्याकडे काही भाकरी व मासा आहे. माझ्यासाठी खाण्यास आणा." आणि त्यांनी त्याच्यासाठी खावयास आणले, आणि तो तेथे उभा राहिला आणि ते खाल्ले. म्हणाला, "आता, जसा मी खातो तसा आत्मा खातो का? आत्म्याला मांस आणि हाडे असतात का जशी मला आहेत?" पहा? तो म्हणाला, "मी तो आहे. मी तो आहे."

54 आणि पौल म्हणाला, "आपल्याला कोणत्या प्रकारचे एक शरीर असेल हे अगदी तंतोतंत अजून प्रकट झालेले नाही, परंतु आपल्याला ठाऊक आहे आपल्याला त्याच्या सारखे शरीर प्राप्त होईल." काय? कधी त्याच्याकडे तो आत्मिक देह होता? होय, महाशय. जेव्हा तो मेला, पवित्रशास्त्र म्हणते की (तो हे परत व्यक्तिगत सर्वनाम आहे) तो अधोलोकात गेला आणि तुरुंगातील आत्म्यांना प्रचार केला. हालेलूया! त्याने ते कसे केले? त्याच्याकडे स्पर्शाची संवेदना होती, त्याच्याकडे ऐकण्याची संवेदना होती, त्याच्याकडे बोलण्याची संवेदना होती. त्याने त्याच प्रकारच्या शरीराने प्रचार केला ज्या शरीराला मी त्या रात्री गौरवी असे पाहिले. त्याने त्या आत्म्यांना प्रचार केला जे नरकात होते, ज्यांनी नोहाच्या दिवसात सहन करण्याच्या वेळी पश्चाताप केला नाही.

परंतु जेव्हा तो इस्टरच्या दिवशी उठला, ते शक्य नव्हते की त्या शरीराने कुजावे, कारण दावीद संदेष्ट्याने हे अगोदरच पाहिले होते: "मी त्याचा जीव अधोलोकात राहू देणार नाही, मी माझ्या पवित्र जनास कुजण्याचा अनुभव येऊ देणार नाही. शिवाय माझा देह आशेत विश्राम करील, कारण तो माझा जीव अधोलोकात राहू देणार नाही, तसेच तो माझ्या पवित्र जनाला कुजण्याचा अनुभव येऊ देणार नाही." आणि बहात्तर तासामध्ये - कुजण्याची प्रक्रिया सुरु होण्याअगोदर - ते आत्मिक शरीर, ते शरीर ज्याने त्या तुरुंगातील आत्म्यांना जाऊन, प्रचार केला, ज्यांनी नोहाच्या सहन करण्याच्या दिवसात पश्चाताप केला नाही, परत उठला; आणि जे मर्त्य त्याने अमरत्व परिधान केले, आणि तो उभा राहिला आणि त्याने खाल्ले, आणि त्याने [अस्पष्ट शब्द] तो मनुष्य होता. हालेलूया!

55 तसेच जसे आपण त्याला पाहू, भाऊ इवान्स. तेव्हाच जेव्हा तो दाविदाच्या सिंहासनावर बसेल. हालेलूया! तेव्हाच जेव्हा आपण खाली व वर चालू, आता, मी तुमच्याबरोबर दशलक्ष वर्षांसाठी डोंगराच्या पलीकडे सहलीसाठी येईन, पहा - फक्त काही दिवस, फक्त काही मिनिटे. आपण तेथे पलीकडे जाऊ, तेथे सभोवती बसू.

आणि जेव्हा खाण्याचा समय येईल, तुम्हाला माहित आहे, पहिली गोष्ट तुम्हाला ठाऊक आहे, बहीण वूड म्हणाली ... मी म्हणालो, "बहीण वूड, बरे, तू इतका सर्व वेळ कुठे होतीस? मी तुला पाहिले नाही ... असे मला भासते की ती पंधरा मिनिटे असावीत."

"ओह, ते दोन हजार वर्षांअगोदर होते, भाऊ ब्रॅन्हम."

"उ-हू. तुला कसे वाटते?" ओह, अर्थात तुम्हाला चांगले सोडून अजून काही वाटूच शकत नाही.

"म्हणू! येथे या, मुलांनो, मी तुम्हा सर्वांना काहीतरी दाखवीन, भावांनो, माझ्या प्रिय भावांनो. येथे पाण्याचा झरा आहे, सर्वात चांगले जे कधी तुम्ही प्यायले असेल." आणि, ओह, आपल्याला चांगले थंड पेय मिळेल. मी तेथे जाईन आणि मोठा भला द्राक्षाचा घड घेईन, आणि आपण सर्व तेथे खाली बसू आणि तो खाऊ. ते अद्‌भुत नसेल का? तेच तंतोतंत ते जे काही आहे. ते अगदी ते आहे.

56 आपल्याला हे कसे मिळाले? आपल्याला हे कसे समजले? देवाने, जगाच्या स्थापनेपूर्वी, आपल्याला पूर्वनिर्धारित केले होते. कोणाला? त्यांना जे वचनदत्त भूमीमध्ये आहेत.

... आपल्याला येशू ख्रिस्ताच्याद्वारे स्वतःचे दत्तक होण्याकरिता ... आपल्या मनाच्या सत्संकल्पाप्रमाणे पूर्वनिर्धारित केले होते,

त्याच्या कृपेच्या गौरवाची स्तुती व्हावी [म्हणून की आपण त्याची स्तुती करावी, जसे त्याने म्हटले. तोच तो जे काही होता, देव; आपल्याला त्याची स्तुती करायची आहे.] त्याच्या कृपेच्या गौरवाची स्तुती व्हावी, ज्यामध्ये त्याने त्याच्या प्रियजनात आपल्याला स्वीकारले. [ख्रिस्तामध्ये आपण स्वीकारलेले आहोत.]

ज्यामध्ये आपल्याला रक्ताद्वारे उद्धार आहे, पापांची क्षमा आहे....

57 मला दत्तकपणाकडे मागे जाणे आहे, परंतु एका मिनिटासाठी येथे मला पापावर थांबणे आहे. पाप, तुम्ही ते पाहिले का? तुम्हाला ठाऊक आहे देव पाप्याला पाप केल्याबद्दल दोष लावीत नाही? तो त्याला पापी असल्यामुळे दोष लावतो. जर पापी सिगारेट ओढीत असेल, तो त्याकरिता त्याला दोष लावीत नाही; तो पापी आहे, कसेहीकरुन, पहा. त्याच्याकडे कोणते पाप नाही, पाप्याकडे नाही. तो फक्त पापी आहे, पहा. त्याच्याकडे कोणते पाप नाही. परंतु तुमच्याकडे पाप आहे, तुम्ही जे ख्रिस्ती आहात. तुम्ही येथे लक्ष दिले का तो मंडळीशी बोलत आहे? तिला सरळ ठेवा, पहा. "पापांची क्षमा," पाप[s-i-n-s]. आपण पाप करतो, परंतु पापी हा सहज पापी आहे. देव त्याला क्षमा करीत नाही....

58 आता, तुम्ही म्हणता, "बरे, तो बाहेर गेला येथे आणि एका माणसाला गोळी झाडली. त्याबद्दल तुम्ही काय करणार आहात?" ते काही माझे काम नाही. मी सुधारक नाही; मी प्रचारक आहे. कायदा त्याची काळजी घेईल - ते सुधारक आहेत. ते.... बरे, म्हणता, "त्याने व्यभिचार केला." ते कायद्यावर अवलंबून आहे. ते त्याच्यामध्ये आणि कायद्यामध्ये आहे. मी सुधारक नाही. मी लोकांमध्ये सुधारणा करीत नाही. मी त्यांचे परिवर्तन होईल असे करतो. मी प्रचारक आहे, पहा. त्याला देवाकडे आणणे हे माझे काम आहे. जर तो पाप करतो, ते त्याचे काम आहे - तो पापी आहे. देव त्याला वरच्या पातळीवर दोषी ठरवितो. तो सुरुवातीपासूनच पापी आहे. सुरुवातीपासूनच तो दोषी गणलेला आहे. तो अगदी

पहिल्या पायाजवळ ही आला नाही. तो कुठेही नाही. सुरुवातीपासूनच तो पापी आहे. त्याच्याकडे कोणते पाप नाही; तो पापी आहे.

59 तुम्ही बाहेर जाऊन, सांगू शकत नाही, "इतकी रात्र आहे, आणि इतकी रात्र नाही." नाही, ती सर्व रात्र आहे. अगदी सर्व रात्र. तेच काय ते देव म्हणतो. ते बरोबर आहे. तो अगदी पापी आहे, बस एवढेच. "आता, त्याने हे केले. इतकी रात्र आहे, हे सरळ येथे वास्तविक काळी रात्र आहे." मला ठाऊक आहे, परंतु ती अगदी संपूर्ण रात्र आहे, बस एवढेच, पहा.

मी म्हणू शकत नाही, "येथे सरळ इतका प्रकाश आहे." नाही, तो अगदी सर्व प्रकाश आहे, पहा, अगदी प्रकाश. तुम्ही सांगू शकत नाही कितीसा, पहा. परंतु जर तेथे यामध्ये काळा डाग असेल, मग त्यामध्ये अंधकार आहे.

60 तेव्हा पाप, पा-प[s-i-n-s], आपल्याला त्याच्या कशाद्वारे पापांची क्षमा आहे? रक्त, मूल्यवान रक्त.

...त्याच्या कृपेच्या समृद्धीप्रमाणे...

आपल्याला ती कशी मिळाली? कारण आपण योग्य होतो, आपली पापे क्षमा व्हावी म्हणून आपण काहीतरी केले? त्याच्या कशाने?

...कृपेने;

ओह, माझ्या! माझ्या हाती मी काही आणले नाही, प्रभू. मी काही करु शकत नव्हतो, तेथे कोणती गोष्ट नव्हती जी मी करु शकत होतो. पहा! त्याने मला पूर्वनिर्धारित केले, त्याने मला पाचारण केले, त्याने मला निवडले. मी कधीही त्याला निवडले नाही. त्याने मला निवडले, त्याने तुम्हाला निवडले, त्याने आपणा सर्वांना निवडले. आपण त्याला निवडले नाही. येशू म्हणाला, "तुम्ही मला निवडले नाही, मी तुम्हाला निवडले." तो म्हणाला, "पित्याने प्रथम आकर्षिल्याशिवाय कोणी मनुष्य माझ्याकडे येऊ शकत नाही, आणि जे काही पित्याने मला दिले आहे ते माझ्याकडे येईल. आणि नाशाच्या पुत्राशिवाय, कोणीही गमावणार नाही, शास्त्रलेख पूर्ण होण्यासाठी." तुम्ही पहा? म्हणाला, "जे सर्व पित्याने मला दिले आहे ते माझ्याकडे येईल."

61 ओह, मला खूप उशीर होत आहे, मला नाही का? आणि मी यातून कधीच बाहेर येणार नाही. अजूनही याची मी सुरुवात ही केली नाही. मला त्वरा करु द्या. मला येथे सरळ काहीतरी समजून देणे आहे अगदी तात्काळ आता जर आपण त्वरा केली. मला त्या दत्तकपणावर फक्त एका मिनिटात परत येणे आहे. ओह, तुम्ही मला फक्त एका मिनिटासाठी क्षमा कराल? येथे हे घेऊया. यातील काही लोक दूरवरुन जॉर्जियातून येथे आले आहेत, फक्त आज रात्रीसाठी. त्यांचे हृदय आशीर्वादित होवो. आता, जॉर्जियातील, आणि टेक्सास, आणि जेथून कोठून तुम्ही भाऊ असाल, हे ऐका. पाचवे पद, यावर रेंगाळूया काही मिनिटे.

62 आपल्याला पूर्वनिर्धारित केले आहे होण्याकरिता....

होण्याकरिता. 'होण्याकरिता' या शब्दाचा अर्थ काय, शब्द 'करिता' काय आहे? त्याचा अर्थ की आपण कशाकडे तरी येत आहोत, करिता. "मी झऱ्याकडे जात आहे. मी खुर्चीकडे जात आहे." ह्युमस, तुला ते कळले? "मी मेजाकडे जात आहे." आता,

त्याने आपल्या मनाच्या सत्संकल्पाप्रमाणे, आपल्याला येशू ख्रिस्ताच्या द्वारे स्वतःचे दत्तक होण्याकरिता पूर्वनिर्धारित केले होते,

किती सत्संकल्प? तो कोणाचा सत्संकल्प होता, कोणाचे चांगुलपण? त्याचे स्वतःचे. त्याच्या स्वतःच्या मनाच्या सत्संकल्पाप्रमाणे.

63 आता, दत्तकपण काय आहे? (आता मला ते सापडू दे. मला ठाऊक नाही.... माझ्याकडे यामधून जाण्यासाठी वेळ नाही, परंतु मी त्यावर प्रहार करिन. मग जर तेथे प्रश्न असेल, तुम्ही मला थोड्या वेळानंतर विचारु शकता, कधीतरी संदेशात, काहीतरी.) ऐका. तुमचे दत्तकपण हा तुमचा जन्म नाही. तुमचे दत्तकपण हे तुम्हाला पदावर नेमणे आहे. जेव्हा तुम्ही नव्याने जन्म घेता (योहान १:१७, मी विश्वास करतो), जेव्हा आपण देवाच्या आत्म्याने जन्म घेतो, आपण देवाचे पुत्र होतो. परंतु आपण पूर्वनिर्धारित असतो. आता येथेच जेथे मी तुम्हाला समजवण्याचा प्रयत्न करणार आहे, कारण हे शेवटच्या दिवसातील पुत्रांना, तुम्ही पहा. आपण दत्तकपणासाठी ... पूर्वनिर्धारित होतो. माझ्या!

आता आपण येथे आहोत. आता, हेच काय ते पेन्टिकॉस्टलना थोडेसे दुखविते. ते म्हणतात, "मी नव्याने जन्मलेलो आहे! प्रभूची स्तुती असो, पवित्र आत्मा मिळाला आहे!" ते चांगले आहे. तुम्ही देवाचे मूल आहात. ते बरोबर आहे. परंतु अजून ही ते ते नाही ज्याबद्दल मी बोलत आहे. पहा, तुम्ही दत्तकपणासाठी पूर्वनिर्धारित होते. दत्तकपण हे पुत्राला पदावर नेमणे आहे.

(मी त्याच्या खूप निकट आहे, कारण बेकी मला म्हणाली की मी याच्या खूप निकट जातो, तुम्ही मागे तेथे ऐकू शकत नाही.)

मी.... पहा,

64 एक मूल.... जुन्या करारातील दत्तकपणाचा नियम किती जणांना ठाऊक आहे? अर्थात तुम्हाला.... पहा. पुत्र जन्म घेतो. (मी विश्वास करतो मी ते कोणत्यातरी उपदेशात घेतले आहे. तो काय आहे, जेन, तुला लक्षात आहे? तो ध्वनिमुद्रणपट्टीवर आहे. ओह, तो काय होता? मी त्यावर बोललो आहे. ओह, होय, मला तो मिळाला. "तुम्ही त्याचे ऐका." "तुम्ही त्याचे ऐका" - मुलांचे दत्तकपण.)

आता, जुन्या करारात, जेव्हा कुटुंबात मुल जन्म घेते, तो जेव्हा जन्मतो तो मुलगा असतो. कारण तो त्याच्या आईवडिलांकडून जन्मतो, तो कुटुंबाचा पुत्र असतो आणि सर्व गोष्टींचा वारस असतो. आता, परंतु हा पुत्र शिक्षकांद्वारे वाढविला जातो. गलतीकरांस, पाचवा अध्याय, सतरा ते पंचवीस पद. ठीक आहे. तो शिक्षक, पालक, कारभाऱ्यांद्वारे वाढविला जातो. आता, उदारणार्थ, जर माझ्याकडे पुत्र जन्मला, म्हणूया, मी एक

पिता आहे आणि....

65 आणि त्याच कारणास्तव किंग जेम्समध्ये.... किती जणांनी कधी विचार केला ते किंग जेम्स आवृत्तीमध्ये वाचलेले विचित्र आहे, म्हणते, "माझ्या पित्याच्या घरात राहण्याच्या जागा पुष्कळ आहेत."? घर, पुष्कळ महाल? पहा? वास्तविक, किंग जेम्ससाठी ज्या दिवसात पवित्रशास्त्र भाषांतर केले गेले, तेव्हा घर म्हणजे राज्य होते. "माझ्या पित्याच्या राज्यात कित्येक महाल आहेत." घरामध्ये, महाल नाही, परंतु त्याला या राज्याचा पिता संबोधले गेले. ते त्यांच्यासाठी फारच पवित्र शास्त्राप्रमाणे होते. पवित्र शास्त्रात ते या प्रकारेच आहे.

जेव्हा पित्याकडे महान भलेमोठे हजारो एकराची शेती होती, किंवा दुसरे काहीतरी, त्याच्याकडे तेथे राहण्यासाठी लोकांचा घोळका असे. तो मेंढराची काळजी घेण्यासाठी लोकांना भाड्याने घेई; त्याच्याकडे काही गुराढोरांची काळजी घेण्यासाठी असत; त्याच्याकडे येथे वरच्या स्तरासाठी धावण्यास शंभर मैलावर काही असत. आणि त्याच्याकडे काही अगदी सरळ येथे बकऱ्यांची काळजी घेण्यासाठी असत, आणि त्याच्याकडे काही खेचरे आणि भिन्न गोष्टींची काळजी घेण्यासाठी असत. त्याच्याकडे अगदी भलेमोठे राज्य असे. आणि तो त्याच्या लहानशा गाढवावर स्वार होई आणि सभोवार प्रत्येकाकडे जाई आणि ते कसे काय काम करीत आहेत ते पाही, मेंढ्याची लोकर कातरणी आणि सर्वकाही अशा प्रकारे. त्याच्याकडे समय नसे....

(जेव्हा मी तेथून दूर जातो तुम्ही मला ऐकू शकत नाही. मी येथे मागे राहण्याचा प्रयत्न करीन. आता तुम्ही मला ठीक ऐकू शकता, येथे?) पहा.

66 तो स्वार झाला, आणि निघून गेला, त्याच्या राज्याची काळजी घेण्याचा प्रयत्न करीत. तेव्हा आता त्याला हवे आहे.... त्याच्याकडे जे काही आहे त्या सर्वाचा तो पुत्र वारस होणार आहे. तो वारस आहे.

आणि जेव्हा आपण येशू ख्रिस्ताद्वारे देवाच्या राज्यात जन्म घेतो, आपण स्वर्गाचे वारस होतो, येशूबरोबर सहवारस, कारण त्याने आपले स्थान घेतले. तो आपण (पाप) झाला, जेणेकरुन आपण तो (नीतिमत्व) व्हावे. पहा? तो मी झाला जेणेकरुन मी तो व्हावे, पहा, त्याच्याबरोबर सहवारस. ठीक आहे, आता तुमच्यातील प्रत्येक जणाने, ते लक्षात ठेवा.

67 आता, लक्षात आहे, देवाने तुम्हाला, पूर्वज्ञानाद्वारे, पूर्वनिर्धारित केले, की तुम्ही याकडे यावे. सर्वजण हे समजतात, तुमचा हात वर करा. देवाने, पूर्वज्ञानाद्वारे, वचनदत्त देशात येण्यासाठी तुम्हाला पूर्वनिर्धारित केले. आज ख्रिस्तीजनासाठी वचनदत्त देश काय आहे? जर तुम्हाला माहित आहे फक्त तुमचा हात वर करा. "अभिवचन तुम्हाला आणि तुमच्या मुलांना, आणि जे दूरवर आहेत त्या सर्वांना आहे." "आणि देव म्हणतो, शेवटच्या दिवसात असे घडेल, की मी सर्व मनुष्यमात्रांवर, माझ्या आत्म्याचा वर्षाव करीन, तुमच्या पुत्रावर आणि तुमच्या कन्यावर." आणि यशया २८:१८ मध्ये, "नियमावर नियम, कानावर काना; थोडे येथे, थोडे तेथे. जे काही चांगले ते घट्ट धरुन ठेवा. कारण तोतऱ्याच्याद्वारे परभाषेत मी या लोकांशी बोलेन. आणि ही विश्रांती आहे, [विसावा - शब्बाथाची भूमी] की मी म्हणालो की त्यांनी यामध्ये प्रवेश करावा." आणि या सर्वांकरिता, ते ऐकतना, परंतु त्यांनी त्यांचे डोके हलविले आणि निघून गेले, आणि ते ऐकले नाही, पहा. तंतोतंत.

68 ते काय होते? अगदी तंतोतंत त्या लोकांप्रमाणे जे सर्व कनानातून आले होते ... किंवा, मिसरातून, सर्व अरण्यातून, आणि सरळ पुढे ... इतके पुरेसे निकट की त्या द्राक्षाची चव घेतली जी त्या भूमीतून आली होती. भावा, तेथे, त्या मनुष्यांना हवे आहे की मी ते इब्री ६ मध्ये रेखाटावे. मी ते कसे करु शकतो? ते सीमारेषेवरील विश्वासू आहेत. ते कधीही पलीकडे जाणार नाहीत! ते पलीकडे जाऊ शकत नाही. येशू म्हणाला.... ते म्हणाले, "आमच्या पूर्वजांनी अरण्यात मान्ना खाल्ला."

आणि येशू म्हणाला, "आणि त्यातील प्रत्येकजण मेले." ते विभक्त झाले. ते प्रत्येकजण मेले. ते बरोबर आहे. म्हणाला, "परंतु मी जीवनाची भाकर आहे जी स्वर्गातून देवाकडून येते. जर मनुष्याने ही भाकर खाल्ली, तो कधीही मरणार नाही. ते बरोबर आहे. होय, महाशय, त्याला अनंत जीवन आहे जर त्याने हे खाल्ले. मी ते एदेनच्या बागेतील जीवनाचे झाड आहे.

69 आता, पहा, हे लोक इतक्या निकट आले होते! पहा जर तुम्ही इब्री ६ मध्ये निरीक्षण कराल - त्यामध्ये मागे जात नाही - परंतु इब्री ६ मध्ये, "हे लोक एकदा भागीदार बनविले गेले, इतक्या निकट आले, आणि स्वर्गीय दानाची रुची घेतली." ते सभोवती बसले, त्यांनी आरोग्य मिळताना पाहिले, त्यांनी लोकांना देवाच्या सामर्थ्यामध्ये पाहिले, त्यांनी जीवन बदललेले पाहिले - परंतु ते त्यावर हात ठेवणार नाहीत. नाही, महाशय. नाही, महाशय. "आणि त्यांनी येणाऱ्या जगाच्या सामर्थ्याची रुची घेतली आहे; आणि जर परत एकदा त्यांनी पश्चातापाद्वारे स्वतःचे नूतनीकरण करण्याचा प्रयत्न केला, पाहता की ते देवाच्या पुत्राला स्वतःकरिता नव्याने वधस्तंभावर खिळतात, आणि ज्या कराराच्या रक्ताद्वारे त्यांचे पवित्रीकरण झाले आहे त्याला अशुद्ध लेखतात...."

"मी त्या मंडळीच्या मालकीचा आहे जी पवित्रीकरणावर विश्वास करते." जेवढ्या पुढे ती जाऊ शकते तेवढे चांगले आहे, परंतु तुम्ही पुरेसे पुढे जात नाही, पहा. होय, महाशय. अरण्याने त्यांना पवित्र केले. होय, खरोखर. त्यांच्याकडे पितळेचा सर्प होता आणि पितळेची वेदी होती, आणि तेथे बाहेर सर्वकाही, पवित्रीकरण; परंतु विश्रांतीसाठी त्यांनी पॅलेस्टाईनमध्ये प्रवेश केला.

70 इब्री ४ मध्ये पहा. त्याने नाही का म्हटले "दुसरा विसावा"? देवाने सातव्या दिवसाची निर्मिती केली आणि त्यांना सातव्या दिवशी विसावा दिला. दुसऱ्या जागी तो विसाव्याच्या दिवसाबद्दल बोलला, "आणि आज...." - दाविदामध्ये. मग त्याने त्यांना दुसरा विसावा दिला: "दुःखी कष्टी आणि भाराक्रांत जनहो मजकडे या, मी तुम्हाला विसावा देईन." या विसाव्यामध्ये प्रवेश करा. "कारण जो कोणी त्याच्या विसाव्यात आला आहे त्याने ही जसा देवाने आपल्या कृत्यापासून विसावा घेतला आहे तसा आपल्या कृत्यापासून विसावा घेतला आहे." नक्कीच. तेथे तुमचा शब्बाथाचा विश्राम आहे. या वचनदत्त भूमीमध्ये, तुमचा वास्तविक विसावा आहे.

पवित्र आत्मा हा लोकांकरिता अभिवचन आहे. आणि त्यांना कशासाठी शिकलेले विद्वतापूर्ण प्रचारक हवेत जे त्यांना तोकड्या विजारी परिधान करु देतील, आणि त्यांचे केस कापू देतील, आणि लिपस्टिक लावू देतील; आणि मनुष्ये जी जुगार खेळतील व मद्यपान करतील व विनोद सांगतील, आणि पुढे जातील आणि अशा प्रकारे असभ्य वर्तन करतील, आणि स्वतःला मंडळीचे सभासद म्हणवतील? का ते असे काहीतरी घेतील आणि पवित्र आत्म्याचे नेतृत्व नाकारतील? का, पवित्र शास्त्र म्हणते देवाचे वचन दुधारी तलवारीपेक्षा तीक्ष्ण आहे जे सांधे भेदून जाते, आणि अगदी हृदयाच्या विचारांची पारख करते. होय, अगदी मनातील विचार देखील.

71 आणि जर आपण जग किंवा जगातील गोष्टींवर प्रेम करतो, आपल्यामध्ये अगदी देवाचे प्रेम नाही. "बोलाविलेले खूप आहेत, निवडलेले थोडे आहेत; कारण जीवनाकडे जाण्याचा दरवाजा अरुंद व मार्ग संकुचित आहे, आणि परंतु तेथे थोडे आहेत ज्यांना तो सापडतो." "त्या दिवसात कित्येक माझ्याकडे येतील आणि राज्यात बसतील," येशू म्हणाला, "अब्राहाम, इसहाक, आणि याकोबाबरोबर." परंतु राज्याची मुले बाहेर टाकण्यात येतील, आणि म्हणतील, 'प्रभू, आम्ही तुझ्या नावात हे केले नाही का? आम्ही प्रचार केला नाही का? आम्ही डॉ. अमुक आणि अमुक आणि आदरणीय अमुक आणि अमुक नव्हतो का?" "मला तुमची ओळख कधीच नव्हती. दुष्कर्म करणाऱ्यांनो, माझ्यापासून निघून जा, मी तुम्हाला ओळखत नाही. ते सर्व जे 'प्रभू, प्रभू' म्हणतात, ते आतमध्ये प्रवेश करणार नाहीत, परंतु तो एक जो माझ्या पित्याच्या इच्छेप्रमाणे करतो जो स्वर्गात आहे." तोच एक आहे जो आत जातो.

72 तेथे तुम्ही आहात.

या वचनदत्त भूमीत प्रवेश करणे, आपण कसे त्यामध्ये येतो? आपण त्यासाठी पूर्वनिर्धारित आहोत. मंडळी, देवाच्या पूर्वज्ञानाद्वारे, कशासाठी पूर्वनिर्धारित आहे? त्याच्या सन्मानासाठी, त्याच्या कृपेद्वारे, गौरवाकरिता, आणि उपासना, आणि देवाचे गौरव. प्रारंभी, पिता, तेथे मागे बसलेला होता, स्वयंभू, त्याच्या सभोवती काही नाही, काहीतरी उपासना करण्यासाठी हवे होते, तेव्हा त्याने जगाच्या स्थापनेपूर्वी मंडळी पूर्वनियोजित व पूर्वनिर्धारित केली, आणि कोकऱ्याच्या जीवनाच्या पुस्तकात त्यांची नावे टाकली जेव्हा तो जगाच्या स्थापनेपूर्वी वधला गेला होता; की ते त्याच्या गौरवाकरिता व त्याच्या स्तुतीसाठी अंतसमयी दृश्यात यावे, जेव्हा तो सर्वकाही तो एक मनुष्य, ख्रिस्त येशूमध्ये, एकत्र करील. हू! गौरव! बस एवढेच. ते अगदी तेथे आहे, माझ्या भावा, बहिणी. तू कधीही त्यापासून ढळू नको.

73 देवाने त्याच्या कृपेच्या निवडीद्वारे तुम्हाला पाचारले; देवाने त्याच्या कृपेच्या निवडीद्वारे तुम्हाला पवित्र केले; देवाने त्याच्या कृपेच्या निवडीद्वारे आणि त्याच्या सामर्थ्याद्वारे तुमचा बाप्तिस्मा केला आणि तुम्हाला या विसाव्याच्या भूमीत ठेवले. ते जे या विसाव्यात आले आहेत ते त्यांच्या भ्रांत मार्गापासून थांबले आहेत. ते त्यांच्या कामापासून विसावा पावले आहे जसा देव त्याच्या कामापासून विसावा पावला. त्यांच्याकडे अनिर्वाच्य आणि गौरवाने भरलेला असा आनंद आहे! जीवनाचे झाड त्यांच्यामध्ये बहरत आहे. त्यांच्याकडे सहनशीलता, सौम्यता, चांगुलपण, धीर, विश्वास, नम्रता, सभ्यता, आणि इत्यादी आहे. जीवनाचे झाड त्यांच्यामध्ये बहरत आहे कारण त्यांची आशा ख्रिस्त येशूमध्ये नांगरलेली आहे, पवित्र आत्म्याची साक्ष चिन्हे आणि अद्भुतांनी विश्वासूंना अनुसरते. "विश्वासणाऱ्याबरोबर ही चिन्हे असतील." जसे ते पुढे जातील, ते आजाऱ्यांना बरे करतील, ते भुते काढतील, ते अन्यभाषा बोलतील, ते दृष्टांत पाहतील. ओह, ते देवाबरोबर चालतील, ते देवाबरोबर बोलतील. कोणता ही सैतान त्यांना हलवू शकत नाही. ते स्थिर असतील, चांगल्या स्थळाकडे पाहत. भूतकाळातील गोष्टी विसरुन, ते ख्रिस्त येशूच्याठायी देवाचे जे वरील पाचारण त्याकडे धावतात. तेथे ते आहेत. तेथे ते आहेत. ती मंडळी आहे!

74 ते तेथे कसे गेले? तुम्ही म्हणू शकत नाही, "बरे, प्रभू, तुला ठाऊक आहे, एक दिवस मी सिगारेट ओढावयास लागलो; आणि मी खाली पडलो आणि मी विचार केला मी...." ओह, नाही, नाही, नाही, नाही.

पूर्वनिर्धारितपणा - त्याने आपल्याला पाचारले. आणि जेव्हा आपण पडलो तेव्हा आपण म्हणालो, "देवा, आम्ही हरवलेलो होतो आणि अपुरे असे होतो." आमच्याकडे आम्हाला वाचवावे असे अगदी मन देखील नव्हते. आम्हाला डुकरांचा स्वभाव होता, आम्ही सुरुवातीपासून डुकरेच होतो.

तुम्ही बाहेर जाऊन डुक्करखान्यात जा आणि एका म्हाताऱ्या डुकरीणीकडे पहा, आणि म्हणा, "आता, येथे पहा, म्हाताऱ्या डुकरीणी, मला तुला काहीतरी सांगायचे आहे. तू ती घाण पिणे हे चुकीचे आहे."

ती म्हणेल, "ओइन्क-ओइन्क," पहा. आता, तेवढेच जेवढे तुमच्याकडे तुम्ही स्वतःला वाचविण्यासाठी आहे. ते तंतोतंत आहे.

75 तुम्ही म्हणता, "महिला, तू अशाप्रकारे वस्त्र परिधान करता कामा नये. तू व्यवस्थित वस्त्र परिधान करावे. तू हे करावे. तू तेथे जाता कामा नये ... तू त्या कार्ड मेजवानीला जाऊ नये. तू सिगारेट ओढू नये. तू हे करु नये. मिस्टर, तू हे राखू नये...."

तो म्हणेल, "ओइन्क-ओइन्क. मी ओइन्क-ओइन्कच्या मालकीचा आहे." हू-हू. "ओइन्क," तेवढेच जेवढे काही त्यांना ठाऊक आहे. "बरे, मी तुला कळवू इच्छितो तू जेवढा चांगला आहे तेवढाच मी आहे. ओइन्क-ओइन्क!" पहा, ते पवित्र आत्म्याचे नेतृत्व नाकारतात, कारण पवित्रशास्त्र म्हणते की जर तुम्ही जग किंवा जगातील गोष्टींवर प्रेम करता, तुमच्यामध्ये अगदी देवाचे प्रेम नाही.

76 त्यांना काय असाधारण बनविते? तुम्ही पवित्र राष्ट्र आहात. तुम्ही काय केले आहे? त्या भूमीत बाहेरुन प्रवेश केला आहे. तुम्ही पलीकडे दुसऱ्या भूमीत आहात. तुम्ही तेथे पलीकडे कसे गेलात? ती वचनदत्त भूमी आहे. कोणत्या प्रकारचे अभिवचन? "आणि शेवटच्या दिवसात असे होईल की, देव म्हणतो, मी सर्व मनुष्य मात्रावर माझ्या आत्म्याचा वर्षाव करीन." एका आत्म्याद्वारे आपणा सर्वांचा या वचनदत्त भूमीत बाप्तिस्मा झाला आहे. आमेन. भावांनो आणि बहिणींनो, हालेलूया, शुद्ध अंतकरणाने, मत्सर नाही, शत्रुत्व नाही, काहीही नाही! मी पर्वा करीत नाही जर भाऊ चुकीच्या मार्गावर गेला, काही फरक पडत नाही तो काय करतो, तुम्ही त्याच्यापाठी जाल.

77 अलीकडेच मी एका भावाच्या पाठी गेलो जो चुकीच्या मार्गावर गेला. एक तरुण मनुष्य मला म्हणाला, म्हणाला, "त्या बदमाश माणसाला जाऊ द्या. त्याला एकटे सोडा."

मी म्हणालो, "जर मी कधी अशा ठिकाणी येईन जेथे माझे हृदय माझ्या भावाकडे जाणार नाही, मग माझ्यासाठी ती वेळ असेल की मी वेदीवर जावे, कारण मी कृपेतून पडलेलो आहे." मी म्हणालो, "जोपर्यंत त्याच्या शरीरात श्वास आहे मी त्याच्यापाठी जाईन, आणि कुठेतरी रस्त्यात मी त्याला पकडीन." होय, महाशय. आणि मी त्याला पकडले (हालेलूया), त्याला मागे परत आणले. ते बरोबर आहे. आता तो कळपात सुरक्षितपणे परत आला आहे. होय, महाशय. तो जसे जग आहे तसाच नक्की चुकीच्या मार्गात गेला असता.

78 काही वेळापूर्वी जेव्हा मी त्या गरीब लहानशा स्त्रीला तेथे बसलेले पाहिले, आणि शेरिफने मला बोलाविले, म्हणाला, "का ती मानसिक रुग्णाच्या स्ट्रेटजाकेटमध्ये असावयास हवी होती." म्हणाला, "ती अगदी बुद्धिभ्रम झालेली आहे, ती गोंधळलेल्या स्थितीत आहे." त्यांनी तिला हॉटेलमध्ये ठेवले. ते करु शकत नाही....

मी म्हणालो, "ते ठीक आहे."

शेरीफ म्हणाला, "का, बिली [मी त्याला चांगल्या प्रकारे ओळखतो, आणि मी लहान असता पासून त्याला ओळखतो.]," तो म्हणाला, "जर तेथे काही असेल जे मी करु शकतो तुला मदत करण्यासाठी...."

मी म्हणालो, "ते ठीक आहे."

म्हणाला, "तू तिला मदत करु शकतो?"

मी म्हणालो, "नाही, परंतु तो करु शकतो." मी म्हणालो, "तिला माझ्याकडे द्या."

तेव्हा त्यांनी तेथे तिला बाहेर आणले. आणि जेव्हा काही वेळापूर्वी ती निघाली, शांतीत, ते काय होते? आम्ही तिच्यामागून प्रार्थना पाठविली. आमेन! ती इतकी....

ते म्हणाले, "तुम्हाला डॉक्टर हवा आहे का? तिच्या पतीला म्हणाले, "तुम्हाला डॉक्टर हवा आहे का?"

म्हणाला, "डॉक्टर तिच्यासाठी काहीही करु शकत नाही." आणि ते बरोबर आहे. ती वेडी होती. डॉक्टर तिच्यासाठी काहीही करु शकत नाहीत.

म्हणाला, "तेथे जाणे ही केवळ आमची आशा आहे."

आणि तो म्हणाला, "बिली, मी ते समजू शकत नाही."

मी म्हणालो, "तुला समजावे अशी मी अपेक्षा करीत नाही, पहा. तुला समजावे अशी मी अपेक्षा करीत नाही."

79 परंतु, ओह, माझ्या, मी देखील ते समजत नाही. नाही. परंतु, भावा, मी लक्षात करतो जेव्हा एक वेळेस मी पलीकडे दूर होतो, काहीतरी माझ्या पाठी आले. आमेन! ते यासाठी नाही की मला यायचे होते, परंतु ते यासाठी की काहीतरी माझ्या मागे आले; कारण जगाच्या स्थापनेपूर्वी, देवाने पूर्वनिर्धारित केले होते (हालेलूया), की आपण त्याच्या सन्मानाला आणि गौरवाला असू. ऐका! ज्यांचे त्याला पूर्वज्ञान होते, त्याने काय केले? पाचारण केले. ते बरोबर आहे? त्याने तुम्हाला पाचारण केले? होय! त्याने तुम्हाला का पाचारण केले? त्याला तुमचे पूर्वज्ञान होते. ज्यांचे त्याला पूर्वज्ञान होते, त्याने पाचारण केले; ज्यांना त्याने पाचारण केले, त्याने नीतिमान ठरवले. ते बरोबर आहे? आणि ज्यांना त्याने नीतिमान ठरवले, त्याने गौरविले आहे! आमेन! तेच काय पवित्रशास्त्र म्हणते. ज्यांचे त्याला पूर्वज्ञान होते, त्याने पाचारण केले - प्रत्येक पिढी. ज्यांना त्याने पाचारण केले, त्याने अगोदरच गौरविले आहे. काय? मला येथे शास्त्रलेख वाचू द्या. ठीक आहे.

त्याने आपल्या मनाच्या सत्संकल्पाप्रमाणे, आपल्याला येशू ख्रिस्ताच्याद्वारे स्वतःचे दत्तक होण्याकरिता पूर्वनिर्धारित केले....

त्याच्या कृपेच्या गौरवाची....

ओह, तुम्हाला ते समजले? त्याच्या कृपेच्या गौरवाची! की तो तेथे अनंत युगे जी येतील त्यामध्ये बसेल, आणि त्याची मुले आरोळी मारतील, "अब्बा, बापा! अब्बा, बापा!"

आणि दूत म्हणतील, "ते कशाबद्दल बोलत आहेत? ते कशाबद्दल बोलत आहेत?"

80 उधळ्या पुत्रामध्ये सुंदररित्या दर्शविले आहे. मी हरवलो होतो. "हा माझा पुत्र आहे. तो हरवला होता आणि आता तो सापडला आहे. तो मेला होता, आणि परत जिवंत झाला आहे. पुष्ट वासरु आणा, उत्तम झगा, अंगठी, आणि त्याच्या हातात घाला. आणि...." आश्चर्य नाही जेव्हा प्रभात ताऱ्यांनी एकत्र गायिले, आणि देवपुत्रांनी आनंदाने आरोळी मारली, जेव्हा त्यांनी तारणाची योजना पाहिली, देव जगाच्या स्थापनेपूर्वी तुमचे नाव पुस्तकात टाकीत होता....

81 आता तुम्ही म्हणता, "कॅल्विन अशाप्रकारेच काहीतरी विश्वास करतात." मी कॅल्विनचा विश्वास करीत नाही. कॅल्विन खुनी होता. कॅल्विनने माणसाला ठार केले कारण त्याने येशूच्या नावात बाप्तिस्मा घेतला. तो बदमाश होता, त्याला स्वतःला परिवर्तनाची गरज होती. होय, महाशय.

परंतु ज्याबद्दल तो म्हणाला ... काही गोष्टी ज्या त्याने सांगितल्या त्या बरोबर होत्या. परंतु काय.... त्याची क्रिया, एक मनुष्य जो अशा कशासाठीतरी माणसाला ठार करील, ते भयंकर आहे. ते पापमय आहे. ठीक आहे.

ही कृपा त्याने आपल्यावर विपुलतेने केली आहे....

82 ओह, थांबा, मी ते "दत्तकपण" घेतले नाही, मी घेतले का? मला फारच उशीर झाला आहे का? पाहूया हे येथील घड्याळ काय म्हणते, आपल्याकडे किती वेळ आहे. ठीक आहे. हे लोक जे इतक्या दूरवरुन आले आहेत त्यांच्या खातर फक्त दहा मिनिटे घेऊया. पहा.

83 दत्तकपण, आता ते का केले जाते ते मला तुम्हाला दाखवू द्या. पित्याचे मोठे राज्य आहे ज्यावर तो फेरफटका मारतो. आता त्याच्याकडे पुत्र जन्मला आहे. ओह, तो फार खुश आहे! (तो देव आहे.) तेव्हा तुम्हाला ठाऊक आहे तो पिता काय करतो? तो एक चांगला कारभारी, शिक्षक शोधतो. तुम्हाला ठाऊक आहे एक शिक्षक काय आहे, तुम्हाला नाही ठाऊक? तो शाळामास्तर आहे. तो खूप उत्तम शाळामास्तर शोधतो जो तो संपूर्ण देशात शोधू शकतो. (आणि मग आपण जात आहोत. आता ऐका.) आणि तो उत्तम शाळामास्तर शोधतो जो तो शोधू शकतो. तो अगदी एखादा लबाड घेत नाही. त्याला त्याचा मुलगा वास्तविक मनुष्य हवा आहे.

तुम्हाला तुमची मुले त्याप्रकारे नको आहेत? निश्चित, उत्तम जे तुम्ही त्यांना देऊ शकता! होय, महाशय. तेव्हा जर स्वाभाविक मनुष्य तसा विचार करतो, तुम्ही काय विचार करता देव त्याच्या मुलांबद्दल काय विचार करीत असेल? सर्वात उत्तम जे तो घेऊ शकत होता.

84 तेव्हा, त्याला मनुष्य हवा जो प्रामाणिक असेल. आता, त्याला असा मनुष्य नको आहे जो म्हणेल, "आता, पहा, ज्युनिअर, तुला अगदी जे काही हवे ते तू कर, प्रिय मुला. ओह, होय, पित्या, उह-हू, त्याचे सर्व चांगले चालले आहे. तो चांगला मुलगा आहे." त्याच्या पाठीवर एक लहानशी थाप आणि त्याच्या टोपीवर एक शिरपेच मिळेल. नाही, नाही. त्या माणसाला लागलीच बेदखल केले जाईल. निश्चित. त्याला तो मनुष्य हवा आहे जो सत्यवादी असेल. जर तो मुलगा योग्य रीतीने येत असेल, त्याला सांगेल. जर तो येत नाही, त्याला सांगेल काय चुकीचे आहे.

आणि जर पृथ्वीवरील पिता तो विचार करतो.... तुम्हाला मनुष्य तुमच्याशी प्रामाणिक असलेला नको आहे का, शाळामास्तर तुमच्या मुलांबाबत प्रामाणिक असलेला? निश्चित. बरे, तुम्ही काय विचार करता देव विचार करीत असेल? आणि त्याला ठाऊक आहे. आपल्याला नाही; त्याला आहे. आपण मर्यादित आहोत, आपण सांगू शकत नाही; परंतु तो अमर्यादित आहे आणि त्याला ठाऊक आहे.

85 तेव्हा, तुम्हाला ठाऊक आहे पित्याने काय केले? तो कधीही म्हणाला नाही, "मी माझ्या मुलांच्या निगराणीसाठी पोपला घेणार आहे." तो असेही म्हणाला नाही, "मी बिशपला घेणार आहे." नाही, नाही. त्याने ते केले नाही, कारण त्याला ठाऊक होते पोप चुकीचा असेल, तसाच बिशप देखील, पहा. तो कधीही म्हणाला नाही, "माझ्या मंडळ्यांच्या देखभालीसाठी मी सर्वसामान्य अध्यक्षाला घेणार आहे." नाही, नाही. त्याने पवित्र आत्म्याला घेतले. त्याच्या मुलांना वाढविण्यासाठी तो त्याचा शिक्षक होता.

ठीक आहे. मग कसे तुम्हाला समजेल पवित्र आत्मा नाही...? तो मनुष्य ओठातून बोलतो. तुम्हाला कसे समजेल की तो सत्य सांगत आहे? जेव्हा तुम्ही पवित्र आत्म्याला ओठातून बोलताना पाहता जो प्रत्येक समयी सत्य सांगतो तंतोतंत, भाकीत करतो आणि अगदी उत्तम प्रकारे तसेच घडते, जसा शमुवेल म्हणाला, मग तुम्हाला माहिती पडते की ते सत्य आहे. ते खरे ठरते. कारण देव म्हणाला, "जर तो बोलला आणि जे तो बोलला ते घडले नाही, त्याचे ऐकू नका, कारण मी त्याच्याबरोबर नाही. परंतु तसे घडते, बरे, मग त्याचे ऐका, कारण मी त्याच्याबरोबर आहे," पहा. तेथे तुम्ही आहात. तसेच कसे ते तो करतो.

86 आता, मग तो सभोवती जातो.... आता, तुम्ही काय विचार करता त्या शिक्षकाला जर पित्याकडे जाऊन सांगावे लागेल, आणि म्हणाला, "तुझी मुले भयंकर वर्तन करतात. मी तुला सांगतो, तो तुझा मुलगा, तो विश्वास घातकी आहे. तो सामान्य मुलगा आहे. मी असा माणूस कधी पाहिला नाही! माझ्या, तुम्हाला माहित आहे तो काय करतो? आणि ती तुझी मुलगी! ओह, व्हिव, मला ठाऊक नाही तू तिच्याबरोबर काय करणार आहेस. हम्म! बरे, तुला ठाऊक आहे काय? ती अगदी अशी दिसते जसे.... तिने सर्व त्या पॅलेस्टाईन पलीकडील मुलींसारखी रंगरंगोटी केली आहे. होय, तिला अगदी जसे ते करतात तसे वर्तन करायचे आहे."

"माझी मुलगी?"

"होय, तुझी मुलगी."

तेच काय ते पवित्र आत्म्याला आज मंडळीबद्दल सांगायचे आहे. आश्चर्य नाही आपल्याकडे संजीवन असू शकत नाही, पहा. आता, ते खरे आहे.

87 "तुझ्या पुत्राबद्दल काय? तीच गोष्ट."

"काय?"

"बरे, तुला माहिती आहे तू नेहमी म्हणायचास की ती मेंढरे त्या वरच्या कुरणातच चारली जायला हवीत त्या मेंढरांच्या अन्नामध्ये तेथे वर. होय, तुला ठाऊक आहे त्याने काय केले? त्याने त्यांना तेथे खाली तणांच्या ढिगाऱ्यावर नेले. अगदी त्यांना खाली तेथे नेले आणि त्या सर्वांना तेथे खाडीमध्ये बुचकळविले, आणि त्यांना त्या तणांच्या ढिगाऱ्यावर सभोवती राहू दिले, ते जुने वाळुंज खावयास लावले, आणि ती इतकी दुर्बल आहेत की महत्प्रयासाने तेथून बाहेर ही निघू शकत नाही. [ते बिशप, पाळक आहेत, जे त्याचे सामर्थ्य नाकारतात.] बरे, मी तुम्हाला सत्य सांगतो, माझ्या जीवनात मी कधीच इतका चिंताग्रस्त मेंढरांचा कळप पाहिला नाही. [त्याला ते आवडत नाही. नाही.] आणि तुला माहित आहे

काय? ती गुरे ढोरे वर येथे, तुला ठाऊक आहे, तू त्यांना तेथे अल्फाल्फा खाऊ घालण्यास सांगितले, तुला ठाऊक आहे, त्यांना पुष्ट बनविण्यासाठी?”

“होय.”

“तुला ठाऊक आहे तो त्यांना काय देत आहे?”

“नाही.”

“ती जुनी लोहतण. होय. तो त्यांना संस्था आणि सर्वकाहीमध्ये सामील होण्यास भाग पाडतो. तू तुझ्या जीवनात कधी असे पाहिले नाही. तू कधी असे तुझ्या सर्व जीवनात पाहिले नाही. तुला ठाऊक आहे तो काय करतो? तेथे बाहेर जातो आणि मोठे सिगारेट ओढतो, पाठीमागे. त्याची पत्नी देखील त्याच्याबरोबर आहे, ती तोकडी विजार परिधान करते अगदी जसे बाहेर ते पलिस्टी लोक घालतात. होय.” अशाच प्रकारचा संदेश आज पवित्र आत्मा मंडळीबद्दल नेत आहे. आता, तुम्ही त्याबद्दल काय विचार करता?

ते दत्तकपण आहे. त्याने काय केले? त्याने दत्तकपणासाठी आपल्याला पूर्वनिर्धारित केले. त्याने आपल्याला पवित्र आत्मा दिला - परंतु एक मिनिट थांबा, दत्तकपण, तेच काय ते ज्याबद्दल आपण बोलत आहोत. दत्तकपण!

88 बरे, तुला ठाऊक आहे तो काय करतो? त्या दिवशी बिशप आला. त्याची खाली तेथे लहानशी आरोग्यासाठी सेवा होती, आणि बिशप आला. कोणी मनुष्य, एक भाऊ आला आणि आजाऱ्यांसाठी प्रार्थना करीत होता. आणि तो म्हणाला, 'तू ते थांबव!'

“'ओह, ओह, होय, पित्या बिशप, मी ते करीन.'

“'तू सहकार्य करु नको.'

“'ओह, नाही, नाही, पित्या बिशप, नक्कीच नाही.'

“आणि येथे मी येतो आणि त्याला सरळ तुझ्या वचनामधून सत्य सांगतो. पहा, येथे ते आहे. मी तुझे नियम त्याला वाचून दाखविले अगदी तंतोतंत काय करायचे, आणि तो ते ऐकत नाही. तो म्हणाला, 'ओह, ते दुसऱ्या युगासाठी होते, दुसरा पुत्र, कोणता दुसरा समय. त्याचा अर्थ मला काही नाही.'” तेथे तुम्ही आहात. आता ते सत्य आहे, मित्रांनो. आता तुम्ही पाहत नाही मंडळी कुठे तिचे पदावर नेमणे चुकविते, का आपल्याकडे संजीवन नाही, आपल्याकडे गोष्टी का पुढे जात नाहीत? तेथेच जेथे ते थांबलेले आहेत.

89 यहोशवा म्हणाला, “गाद, मला हवे आहे तू.... आराखड्याप्रमाणे, अगदी सरळ येथे तुझे स्थान आहे. तुझे स्थान येथे आहे, अगदी सरळ येथे. तू येथे ये, गाद, आणि येथे रहा. बन्यामीन, तू सरळ खाली येथे जा. आणि आता तुम्ही सर्व पलिष्टी सीमेपासून दूर रहा.” आणि यहोशवा परत येतो, येथे ते सर्व पॅलेस्टाइनात आहेत, भलीमोठी मेजवानी करीत आहेत, अगदी अशा प्रकारे नृत्य करीत आहेत, आणि सर्व स्त्रिया रंगरंगोटी केलेल्या, आणि सभोवती नाचत आहेत, मोठा समय चाललेला आहे. मग यहोशवा त्याचे डोके खाजवितो, आणि म्हणतो, “आता काय?” आता अगदी तंतोतंत तेच काय ते चाललेले आहे. सर्व नाही, देवाला धन्यवाद. सर्व नाही, परंतु खूपजण. ठीक आहे.

90 आता मग काय घडत आहे? तेच तर घडत आहे. तुम्ही कल्पना करीत नाही तो मनुष्य (पवित्र आत्मा) जेव्हा तो हे सर्व सांगतो पित्यासमोर तेव्हा त्याला लाज वाटते? ओह, माझ्या! “मी त्याला सांगितले, परंतु तो ते ऐकेना. मी ते त्याला सांगितले ... आणि त्याला ते सरळ पुस्तकातून वाचावयास लाविले. माझ्याकडे लहानसा सेवक होता त्याला यावयास लाविले आणि त्याला दाखविले की येशू ख्रिस्त काल, आज, आणि युगानुयुग सारखाच आहे. आणि तुला माहित आहे काय? त्याने त्यांच्यातील एका बकऱ्या राखणाऱ्याला येऊ दिले येथे आणि त्याला सांगितले की ते दुसऱ्या युगासाठी होते, पहा. आणि त्याला इतकी दुर्गंधी येते, की त्या वेळेस तो येथे आला, त्या बकऱ्याच्या वासाने, तुम्हाला माहित आहे - सिगारेटी, आणि तुम्हाला माहित आहे, इत्यादी - जेव्हा तो येथे आला त्याला फार दुर्गंधी येत होती. परंतु मी तुला सांगेन, त्या बकऱ्या राखणाऱ्याकडे पुरेशी पदके होती जी त्याच्यावर टोचली होती, ओह, मी तुला सांगतो, जर तुला त्याचे नाव कागदावर लिहायचे असेल, ते ... त्याचा मृत्युलेखाचा अर्धा कागद त्याच्या पदव्याच घेतील. होय, महाशय, तो निश्चित त्या देशामध्ये त्या लोकांना आवडतो, परंतु मी तुला सांगतो, त्याला निश्चित मेंढरांना कसे खाऊ घालायचे ते ठाऊक नाही. ती एक गोष्ट आहे त्याबद्दल. तो माझे अगदी ऐकत नाही.” पवित्र आत्मा म्हणतो. “मी त्याला सांगण्याचा प्रयत्न केला की तू काल, आज, आणि युगानुयुग सारखाच आहे, परंतु तो अगदी ते करीत नाही. तो सर्वात मोठा भित्रा आहे जो कधी मी माझ्या जीवनात पाहिला असेल. होय. आणि मंडळीने त्याला अध्यक्ष, बिशप, इत्यादी बनविले आहे, आणि सर्व लोक त्याचे ऐकतात.

“आणि मग तुला माहिती आहे काय? ते ते घेतात ... त्यांच्याकडे तेथे लहानशी जुनी गोष्ट आहे ज्याला ते दूरदर्शन म्हणतात. ते त्या लहानशा जुन्या गोष्टीला सुरु करतात अशा प्रकारे, आणि त्या स्त्रिया येतात आणि असभ्य वर्तन करतात, सर्व प्रकारची अर्धी वस्त्रे. आणि, तुला ठाऊक आहे, तुझ्या पुष्कळशा मुली....”

“ओह, निश्चित नाही!”

91 म्हणाला, “होय, त्या आहेत. होय, त्या ते करत आहेत. त्यांच्यातील काही संजीवनासाठी रडतात, पित्या, त्यांच्यातील काहींना खरोखर ते हवे आहे. त्यांच्यातील काही खरोखर रेषेवर चालतात. त्यांच्यातील काही त्या वचनावर अगदी जेवढे ते राहू शकतात तेवढे खंबीर उभे राहतात. इतर, मला ठाऊक नाही काय करावे, ते तेथे फार बाहेर आहेत. ते इतर काय करतात तुला ठाऊक आहे? त्यांची थट्टा करतात, म्हणतात, 'ते

अगदी वेड्यांचा घोळका आहेत.'" बरे, त्या गोष्टीने त्याला खूप वाईट वाटते.

92 परंतु आता चित्र बदलूया. आता पिता ... त्याचा पुत्र चांगला मुलगा आहे. त्याचा पिता सरळ.... येथे शिक्षक आहे, पवित्र आत्मा. कोणत्या मार्गाने पवित्र आत्मा, तो म्हणाला, "मी फिरावयास जात आहे," शिक्षक म्हणाला, "मी...."

मूल म्हणाले, "मी अगदी तुझ्याबरोबर चालेन. मी सरळ तुझ्याबरोबर जाईन."

"ओह, पुत्रा, टेकडी भयंकर उंच आहे."

"मी सरळ तुझ्याबरोबर जाईन. मला तुझ्यामध्ये खात्री आहे. जर मी थकू लागलो, तू माझा हात वर करशील आणि मला धरशील."

"परंतु तेथे त्या टेकडीवर सिंह आहेत!"

"काही फरक पडत नाही. जोपर्यंत तू सभोवती आहेस, त्याने काही किंचित ही फरक पडत नाही. मी सरळ चालणार आहे."

"तेथे वर त्रास आहे, ते निसरडे दगड आहेत."

"मी पर्वा करीत नाही, जोपर्यंत तू माझा हात धरला आहे, मी सरळ तुझ्याबरोबर चालेन. मी सरळ तुझ्याबरोबर चालेन."

"ओह, तुला माहिती आहे काय? तुझा पिता तसे करीत असे."

"ते चांगले आहे. होय, महाशय."

93 तेथे टेकडीच्या माथ्यावर ये. "ओह," तो म्हणाला, "पित्या, तुला ठाऊक आहे काय? तुझा पुत्र म्हणजे जसा बाप तसा बेटा. तो पूर्णतः, तंतोतंत तुझ्यासारखा आहे. प्रत्येक शब्द जो तू म्हणतोस, तो त्याला 'आमेन' करतो. मी त्या दिवशी त्याला पवित्र शास्त्रात वळविले, आणि ते म्हणाले, 'येशू ख्रिस्त काल, आज, आणि युगानुयुग सारखा आहे.' तुला ठाऊक आहे तो काय म्हणाला? त्याने आरोळी ठोकली आणि त्याचे हात त्याने हवेत भिरकावले आणि म्हणाला, 'हालेलूया! आमेन!' "ओह! आणि तुला ठाऊक आहे येथे ते म्हणते, तुझ्या वचनात, तुला ठाऊक आहे, जेथे तू म्हणालास, 'तो जो माझ्यावर विश्वास करतो, जी कृत्ये मी करतो तो देखील करील'?"

"होय, मी लक्षात करतो ते मी माझ्या पुत्राला लिहिलेले आहे. होय, ते मी लिहिलेले स्मरतो."

"ओह, जेव्हा त्याने ते पाहिले, त्याने अगदी आरोळी ठोकली आणि खाली वर उड्या मारल्या, 'हालेलूया!' ओरडला, 'प्रभू, माझ्यातून सर्व जग काढून टाक. मला त्याप्रमाणे बनिव!' होय, महाशय. आणि त्या सर्व गोष्टी ज्या त्याने केल्या!"

"ओह," पिता म्हणाला, "त्या पुत्राबद्दल मी आनंदित आहे. तो चांगला पुत्र आहे. ठीक आहे. काही वर्ष त्याच्यावर नजर ठेव, पहा तो कसा काय पुढे येतो, त्याची कशी काय प्रगती होते."

94 काही काळानंतर वर्ष सरतात. "त्याचे कसे काय चालले आहे?"

"ओह, माझ्या, तो अगदी कृपेत वाढत आहे! ओह, माझ्या, तो अगदी ... तो लाकडाची साल काढतो. मी तुला सांगतो, तो खरोखर.... का, तो त्या मेंढरांना घेतो, अगदी जसे तू त्यांना हाताळतो तसे हाताळू शकतो. तो कधीही त्यांना समुद्री शेवाळ देणार नाही. तो त्यांना कधीही लोहतण देणार नाही. जेव्हा ते सभोवती येतात, म्हणतात 'आम्हाला मंडळीत सामील व्हायचे आहे,' म्हणतो, 'तुमचे तोंड बंद करा, तुम्हाला त्याची गरज नाही! नाही, महाशय. येथे जे काही आहे त्याची तुम्हाला गरज आहे, "पश्चाताप करा, आणि तुमच्यातील प्रत्येकाने, येशू ख्रिस्ताच्या नावात बाप्तिस्मा घ्या, तुमच्या पापांच्या क्षमेसाठी. तुम्हाला पवित्र आत्म्याचे दान प्राप्त होईल."' होय, महाशय, तेच काय ते तो म्हणाला."

"ओह, खरोखर तो असे म्हणाला का?"

"होय, महाशय, तो निश्चित म्हणाला,"

"बरे, अगदी त्याच प्रकारे मी ते लिहिले आहे."

"अगदी त्याच प्रकारे तो ते बोलतो."

"हमम, होय, महाशय."

95 "काही म्हणाले, 'जोपर्यंत तुम्हाला वरुन सामर्थ्य प्राप्त होत नाही तोपर्यंत यरुशलेमेत वाट पहा, जेव्हा पवित्र आत्मा तुम्हावर येईल; तुम्ही यरुशलेमेत, यहूदीयात आणि शोमरोनात, व पृथ्वीच्या शेवटापर्यंत माझे साक्षी व्हाल.' जेव्हा त्याने हे वाचले, त्याने आरोळी मारली, 'हालेलूया, तेच काय ते तुम्हाला हवे आहे!' तुला माहित आहे तो काय करतो? तो अगदी खाली तेथे त्यांना घेऊन बसतो जोपर्यंत त्यांना ते समजत नाही, बस एवढेच. सरळ त्यांच्याबरोबर राहतो.

"आणि जर ते गोंधळ करु लागले, तो म्हणतो, 'वा, वा, वा, एक मिनिट थांबा, एक मिनिट थांबा. त्याप्रकारे बकऱ्या वर्तन करतात, मेंढरे नाही, पहा.' ओह, काही वेळेस ती त्याच्यावर थोडीशी वैतागतात, परंतु तो त्यांना एक प्रकारे पाठीवर थोपटतो थोडेसे, आणि म्हणतो, 'एक

मिनिट थांबा, श-श, श-श, श. ते ठीक आहे.' त्याला वास्तविक ठाऊक आहे मेंढरांना कसे नियंत्रणात ठेवायचे. होय, महाशय, मी तुला सांगतो.

96 "तुला माहित आहे काय? मी आर्चबिशप अमुक अमुकाला त्याला सांगताना पाहिले की तो या शहरात येऊ शकत नाही आणि सभा घेऊ शकत नाही. परंतु, तुला ठाऊक आहे, मी एक प्रकारे त्याचे नेतृत्व केले. मी म्हणालो, 'कसेही करुन जा,' पहा. "या सर्व ध्वनिमुद्रणपट्ट्यांतून गेले आणि, 'तू त्यांना बाहेर जाऊ देऊ नको.' ते कसेहीकरुन गेले. या शहरामधून येथे गेले, म्हणाले, 'बरे, आम्ही प्रायोजित करणार नाही....'

"आणि तुला माहित आहे सैतान तेथे खाली उतरला, म्हणाला, 'मी तुझ्याशी पैज लावतो मी त्याला त्या शहरातून बाहेर ठेवीन.' "मी म्हणालो, 'ते करु शकत नाही. जर मी त्याला जायला सांगितले, तो जाईल. मी पैज लावतो तो जाईल.' 'नाही, नाही, नाही, नाही, नाही. मी त्याला सांगेन. मी तेथे खाली जाईन आणि म्हणेन, "आता, माझ्या सर्व हस्तकांनो, तुम्ही सर्व एकत्र जमा. तुम्हाला तो जुना धर्मवेडा खाली येथे नको आहे, ते सर्व दैवी आरोग्य आणि त्या जुन्या पवित्र आत्म्याच्या गोष्टी. त्या प्रेषितांबरोबर कित्येक वर्षांपूर्वी निघून गेल्या. तुम्हाला ठाऊक आहे ते तेथे मागे, चांगले नाही."' त्यांना जुने लोहतण आणि सर्वकाही अशा प्रकारे देण्याचा प्रयत्न करतो.

97 "परंतु, तुला माहिती आहे काय? तो कसेहीकरुन सरळ तेथे खाली गेला. तेथे सरळ खाली गेला आणि अल्फाल्फा फेकण्यास सुरुवात केली. आणि तुला माहिती आहे काय? त्या मेंढरांनी खावयास सुरुवात केली. त्या धष्ट पुष्ट होऊ लागल्या जेवढ्या होऊ शकत होत्या. होय, महाशय. का, त्यांच्याकडे आरोग्य होते आणि सभा होत्या, आणि तुला माहिती आहे त्यांच्यातील बरेच जण तरुण मुलांनी सुरुवात.... का, त्यांनी पाहिले.... जर त्यांना अल्फाल्फासारखे मोठ्या जुडीचे गवत मिळाले, तुला माहिती आहे ते त्याबरोबर काय करतील? ते इतके चांगले होते की ते त्यांच्या शेजाऱ्यांकडे धावले, म्हणाले, 'याचा स्वाद घ्या! याची चव घ्या!' किशोरवयीन [अस्पष्ट शब्द]. 'होय, महाशय, अगदी असेच येथे आहे. येथे अगदी येथे आहे. अगदी येथे ते आहे, पहा. फक्त, तुम्ही प्रत्येकजण, पश्चाताप करा, आणि येशूच्या नावात बाप्तिस्मा घ्या, जेणेकरुन तुम्हाला पवित्र आत्मा मिळेल. तो जो कोणी इच्छा करील त्यासाठी आहे, त्याला येऊ दे, त्याला येऊ दे. येथे, पहा येथे पवित्र शास्त्र काय म्हणते,' पहा. आणि तेथे खाली त्यांच्याकडे अगदी महान समय होता."

"ओह, तो माझा पुत्र आहे! तो माझा मुलगा आहे. बरे, तू विचार करतोस तो चांगला प्रौढ झाला आहे?"

98 "होय. निश्चित झाला आहे," पवित्र आत्मा म्हणाला. "मी त्याची परीक्षा घेतली. मुला, मी त्याला या मार्गाने पारखले आणि त्याला त्या मार्गाने पारखले. मी त्याला आजारी पाडले, मी त्याला खाली ठेवले. मी त्याला पायदळी तुडविले. मी सैतानाला त्याला सर्वकाही करु दिले जे तो करु शकत होता. तो परत सरळ विश्वास करीत, मागे आला अगदी तसाच. परत आला. मी त्याला आजारी केले. मी हे केले. मी त्याला दवाखान्यात टाकले. मी त्याला येथे बाहेर काढले आणि मी हे केले, मी ते केले. मी त्याच्या पत्नीला त्याच्या विरुद्ध केले, मी त्याच्या शेजाऱ्यांना त्याच्या विरुद्ध केले, मी सर्वकाही विरुद्ध केले. त्याने काडीचा ही फरक पडला नाही. म्हणाला, "जरी त्याने मला वधले, तरी मी त्याच्यावर भाव ठेवीन.' मी त्याचे कुटुंब मारुन टाकले. मी हे घेतले, मी हे केले, मी हे सर्व केले, मी हे केले, ते केले, किंवा इतर सर्व केले. तरीही तो सरळ उभा राहिला, 'जरी त्याने मला वधले, तरीही मी त्याची सेवा करीन! तो माझा आहे!'"

"ओह! बरे, मी विश्वास करतो आपण कुठेतरी त्याला लहानशा विशेष जागी बोलवावयास हवे आणि दत्तकपण करावयास हवे."

आता, जेव्हा पिता, जुन्या करारात, समजतो की त्याचा पुत्र ... वयात आला आहे, आणि दत्तकपणापर्यंत त्याची तयारी झाली आहे.... पर्यंत! ते एक मूल म्हणून जन्मले आहेत, परंतु जेव्हा.... अगदी तेव्हाच तो पुत्र असतो, परंतु मग तो एक फक्त मुल सोडून काहीच नसतो, फक्त एक सामान्य पुत्र, जोपर्यंत तो परिपक्व होत नाही आणि तो काय आहे हे दाखवीत नाही. मग, तेव्हा तो त्याला बाहेर बोलावितो.

99 आता येथे आपण आहोत, मंडळी. तुम्ही तयार आहात? आता थोडासा उशीर झालेला आहे. प्रत्येकाने तुमचे बोट चावा, तुमच्या आत्म्याला चिमटा काढा, आणि तुमचे हृदय खुडा, फक्त एका मिनिटासाठी, पहा. आता आपण मंडळीला स्थानापन्न करणार आहोत. आता जेव्हा मंडळी त्या स्थानापर्यंत पोहोचते, तो म्हणतो, "मनश्शे, तू या स्थानाच्या मालकीचा आहे. एफ्राईम, तू येथे आहेस."

मग पिता, त्यांना विशिष्ट जागेवर नेतो, आणि अशा प्रकारे तो त्याला उच्च स्थानी बसवितो, आणि तो कार्यक्रम करतो, आणि ते सर्व सभोवती येतात. आणि तो म्हणतो, "मला हवे आहे की सर्वांना ज्ञात व्हावे की हा माझा मुलगा आहे, आणि मी माझ्या पुत्राला दत्तक घेत आहे. आणि मला हवे आहे की कोणालाही कळावे, की यापुढे, की त्याचे नाव.... (मी त्याला पेहराव घातला, त्याच्यावर विशेष पेहराव.) आणि मला हवे आहे. आणि मला हवे आहे की तुम्हाला कळावे की त्याचे नाव कोणत्याही धनादेशावर माझ्या नावासारखेच आहे. तो माझे मूल आहे. मी त्याला माझ्या कुटुंबात दत्तक घेत आहे, जरी जेव्हापासून तो जन्मला तो माझा पुत्र आहे. आता जेव्हा त्याने पवित्र आत्मा प्राप्त केला आहे, तो माझा पुत्र बनला आहे. परंतु आता मी त्याला अधिकाराच्या योग्य दर्जावर स्थानापन्न करण्यास जात आहे. जे काही तो ज्याला डच्चू देईल त्याला डच्चू देण्यात येईल, आणि तो जे काही नियुक्त करील त्याला नियुक्त केले जाईल."

"आणि खचित, खचित, मी तुम्हाला सांगतो, जर तुम्ही या झाडाला सांगाल, जर तुम्ही या डोंगराला सांगाल, 'सरकला जा,' आणि तुमच्या हृदयात शंका धरणार नाही, परंतु विश्वास कराल की जे काही तुम्ही म्हणालात ते घडेलच, तुम्ही जे काही म्हणा ते तुम्हाला मिळेल," पहा. तेथे तुम्ही आहात. तेथे तुम्ही आहात, पहा. "तो माझा पुत्र आहे." किती जणांना ठाऊक आहे की दत्तकपण, की ते पुत्राला दत्तक घेतात त्याने सिद्ध केल्यानंतर.... सर्वांनी कधी पवित्रशास्त्र वाचले आहे - पुत्राला स्थानापन्न करणे.

100 आता, देवाने हीच गोष्ट त्याच्या पुत्रासाठी केली जेव्हा त्याने येशूला रुपांतराच्या डोंगरावर नेले. त्याने तेथे वर पेत्र, योहान, व याकोबाला घेतले. ते पृथ्वीवरील तीन साक्षीदार होते. तेथे येशू, मोशे, आणि एलीया, आणि देव, वर डोंगरावर होते. तेथे ते उभे राहिले, डोंगरावर. आणि,

पहिली गोष्ट तुम्हाला माहिती आहे, त्यांनी पाहिले, आणि त्यांच्यासमोर येशूला गौरविण्यात आले. ते बरोबर आहे का? किती जणांना ठाऊक आहे हा शास्त्रलेख आहे? त्याने काय केले? त्याने त्याचा अमरत्वाच्या झग्यामध्ये पेहराव केला. आणि तो म्हणाला त्याची वस्त्रे सूर्यासारखी चमकत होती. ते बरोबर आहे? आणि ढगाने त्याच्यावर छाया केली. पेत्र आणि योहान व ते सर्व उपडे पडले. आणि त्यांनी पाहिले, आणि तेथे मोशे व एलीया त्याच्याबरोबर बोलत, उभे होते. आणि मोशे मेला होता, आणि आठशे वर्षांपासून अचिन्हांकित कबरेत पुरला गेला होता. आणि एलीया त्याच्या पाचशे वर्ष अगोदर रथात बसून स्वर्गात गेला होता. ओह! अहा, परंतु ते अजूनही तेथे होते. तेथे ते त्याच्याशी बोलत होते. पहा, त्याने येशूला वर नेले त्यांना पाहण्यासाठी, ते पाहण्यासाठी की हे सर्व कशाबद्दल होते, तेथे पहा, या गोष्टी दाखवीत होता. आणि ते त्याच्याबरोबर बोलत होते, त्याच्याबरोबर वार्तालाप केला होता.

101 लागलीच जेव्हा पेत्राने पुन्हा मागे पाहिले आणि येशूचे गौरव निघून गेले होते, त्यांनी केवळ येशूला पाहिले, आणि त्या ढगातून वाणी झाली, आणि म्हणाली, "हा माझा प्रिय पुत्र आहे, याचे तुम्ही ऐका! त्याचे नाव आता माझ्या नावाइतकेच चांगले आहे. त्याचे तुम्ही ऐका!" ते ते होते - दत्तक घेणे, किंवा पुत्राला स्थानापन्न करणे. आता, तेथेच जेथे देव पेन्टिकॉस्टल मंडळीला नेण्याचा प्रयत्न करीत आहे, इफिसकराच्या पुस्तकामध्ये, पहा. तुम्हाला समजले?

आपल्याला समाप्त करावे लागेल कारण खूप उशीर होत आहे, पहा, मुलांना झोप येत आहे. आणि मला या पदावर अगदी येथे खाली यावयाचे होते, परंतु मी ते करु शकत नाही, तेराव्या पदापर्यंत, पहा, शेवटचा भाग, "...पवित्र आत्म्याच्या अभिवचनाने मुद्रित केले आहे." आपण ते रविवारी घेऊ, पहा. पहा, आता - आपल्याला काय आत आणते, आणि याद्वारे आपण कसे राखले जातो.

102 परंतु आता स्थानापन्न करण्यासाठी, तुम्ही कसे आहात? तुम्ही प्रथम पवित्र आत्म्याद्वारे राज्यात जन्म घेता. कितीजणांना हे ठाऊक आहे? ठीक आहे. पुढचे, तुम्ही कशासाठी पूर्वनिर्धारित आहात? दत्तकपणासाठी. ते काय आहे? तुम्ही स्थानावर नेमण्यासाठी पूर्वनिर्धारित आहात.

103 ओह, बहीण स्कॉट (मी विश्वास करतो ती आहे), येथे बसलेली, तू ती नाहीस का जी आज घरी आली होतीस? कुठेतरी जगामध्ये, एक शिकवण सभोवती जात आहे, देशाच्या वेगवेगळ्या भागामध्ये (मी त्याबद्दल खूप काही ऐकले आहे), की येशू येथे पृथ्वीवर आहे, शरीरामध्ये सभोवती फिरत आहे, आणि तो आत येतो आणि हे करतो. ते खोटे आहे! त्याचा पवित्र आत्मा येथे आहे, आणि तो त्याच्या मंडळीला योग्य ठिकाणी स्थानापन्न करण्याचा प्रयत्न करीत आहे, त्याची मंडळी अनुक्रमात येण्यासाठी, वचनदत्त देशात स्थानापन्न करीत आहे, जेणेकरुन ते प्रवेश करु ... जेणेकरुन सर्व शत्रूंना बाहेर घालवून देऊ शकतात.

104 मनश्शे त्याची भूमी घेऊ शकत नाही. मी आरोग्य सभा घेऊ शकत नाही जेव्हा अर्धे ... जेव्हा मी तेथे बाहेर जातो आणि येशू ख्रिस्ताच्या नावात बाप्तिस्म्याचा प्रचार करतो, आणि त्रैक्यवादी भाऊ म्हणतो, "ओह, तो जुना 'केवळ येशूवाला' आहे." आणि मी येथे जाऊन, दैवी आरोग्य सभा घेऊ शकत नाही जेव्हा त्यातील अर्धे म्हणतात, "दैवी आरोग्य ठीक आहे...." आणि त्यांच्यातील पुष्कळजण प्रभूच्या चमत्काराचा आनंद घेतात, आणि म्हणतात, "बरे, मी विश्वास करतो भाऊ ब्रॅन्हम संदेष्टा आहे, परंतु मला तुम्हाला काहीतरी सांगू द्या. जोपर्यंत आत्मा त्याच्यावर असतो, आणि तो पारख करत असतो, तो परमेश्वराचा दास आहे; परंतु त्याची शिकवण सडलेली आहे. ती चांगली नाही." कोणी कधी असा केरकचरा ऐकला आहे? ते एकतर देवाकडून आहे किंवा ते देवाकडून नाही. ते बरोबर आहे. ते एकतर सर्व देव आहे किंवा काहीच देव नाही. त्याच प्रकारे ते आहे.

परंतु कसे तुम्हाला मिळणार आहे...? मनश्शे त्याची भूमी राखू शकत नाही, एफ्राईम त्याची भूमी राखत नाही, गाद त्याची भूमी राखत नाही, बन्यामीन त्याची भूमी राखत नाही - ते सर्व येथे पलिष्ट्यांबरोबर धावत आहे, आणि सर्व मिसळलेले आहेत. कसे काय आपण स्थानापन्न केले जाणार? परंतु आम्ही पवित्र आत्म्याद्वारे जन्म पावलेले आहोत, आम्ही सर्वजण. ते बरोबर आहे? आपण कशासाठी जन्म पावलेले आहोत? पूर्वनिर्धारितपणासाठी.... मग जन्म पावल्यानंतर, आपण दत्तकपणासाठी पूर्वनिर्धारित झालेले आहोत, ख्रिस्ताच्या शरीरात स्थानापन्न करण्यासाठी. तुम्ही पाहता मला काय म्हणायचे आहे?

105 ख्रिस्ताचे शरीर काय आहे? काही प्रेषित, काही संदेष्टे, काही शिक्षक आहेत, काही सुवार्तिक आहेत, आणि काही पाळक आहेत. ते बरोबर आहे? आपल्याला पाचारण करण्यात आले आहे.... इतरांना अन्यभाषेची, भाषांचा अर्थ सांगण्याचे, बुद्धिचातुर्य, ज्ञान, चमत्कार, चमत्काराची कार्ये, ही सर्व भिन्न दाने मिळाली आहेत. आणि आता ते काय करतात? ते त्याचा थोडासा सराव करतात. काय? त्याला थोडेसे हलके घेतात अगदी जसे मला ठाऊक नाही कसे. एक उभा राहतो, अन्यभाषेत बोलतो, दुसरा एक पुढे जातो, "ब्ला-ब्ला-ब्ला" बडबड करीत, जसा आहे तसा. प्रचारक प्रचार करीत जातील, वेदीवर बोलावितो, आणि कोणीतरी उभे राहते, अन्यभाषेत बोलते. "हालेलूया, देवाचा गौरव असो." जर प्रचारक त्याच्या संदेशाने पुढे जातो, अभिषिक्त असल्याने, मग लोक म्हणतात, "जुना पतितावस्थेत गेलेला," पहा. त्याला कारण की त्यांना शिकविले गेले नाही.

106 पवित्र शास्त्र म्हणते संदेष्ट्याचा आत्मा संदेष्ट्याच्या स्वाधीन असतो. देव अव्यवस्था माजविणारा नाही. जेव्हा मी येथे उभा असतो, देवाच्या अभिषेकाखाली येथे सेवा करतो, काही फरक पडत नाही तुम्हाला किती अन्यभाषेत बोलायचे आहे, तुम्ही गप्प राहावे जोपर्यंत येथे देव संपवीत नाही. नंतर जर तुम्ही अन्यभाषेत बोलता, ते फक्त काही शास्त्रलेखाची पुनरावृत्ती नसावी, कारण देव म्हणाला व्यर्थ बडबड करु नका. परंतु तो कोणासाठी तरी थेट संदेश असावा. मला एक वेळेस विचारा, तुमचे बोट एका समयावर ठेवा जेव्हा पवित्र आत्म्याने कधी, पारखीच्या अंतर्गत, कोणालातरी सांगितले ... शास्त्रलेखाची परत आणि परत पुनरावृत्ती केली. त्याने त्याला काहीतरी जे त्याच्याबरोबर चुकीचे आहे ते सांगितले आणि काहीतरी जे त्यांनी केले होते, आणि काहीतरी जे त्यांनी करायलाच हवे, किंवा काहीतरी घडायला हवे, किंवा असेच काहीतरी. ते बरोबर आहे का?

तसेच अन्यभाषेत बोलणे आणि त्याचा अर्थ सांगणे आहे. जर तेथे मंडळीत एक असेल जो अन्यभाषेत बोलतो, आणि दुसरा तिचा अर्थ सांगतो.... आता आपण असे म्हणूया: भाऊ नेविल उभे राहून, अन्यभाषेत बोलू दे, आणि हा भाऊ येथे त्याचा अर्थ सांगू दे, म्हणेल, "या माणसाला येथे सांग की काल तो तेथे बाहेर गेला आणि काहीतरी केले जे त्याने करावयास नको होते. आता डॉक्टरने त्याला आज सांगितले त्याला कर्करोग होता. जा ती गोष्ट ठीक कर, आणि परत येथे मागे ये आणि देवाबरोबर ठीक हो."

माणूस म्हणेल, "खरोखर, ते सत्य आहे." मग देव तुमच्याबरोबर आहे.

107 परंतु कसे काय आपण अशा प्रकारे करणार आहोत? पहा? ते अगदी आदळ, आपट, फक्त अव्यवस्थितपणे, कोणत्याही प्रकारे, अजिबात स्थानात नाही. आता ते.... पहा, इफिसकर, प्रयत्न करीत आहेत.... पहा, त्यांनी ते चुकविले. पहा कसे त्यांनी ते चुकविले? आपण पुत्राच्या दत्तकपणाकरिता पूर्वनिर्धारित आहोत. आता कितीजण समजतात मला काय म्हणायचे आहे, तुमचे हात वर करा. दत्तकपण! आपण देवाच्या आत्म्यामध्ये जन्मलो आहोत, निश्चित, पवित्र आत्मा प्राप्त केलेला आहे, आणि "अब्बा, बापा! हालेलूया! देवाचा गौरव!" ओरडत आहोत. ते बरोबर आहे, आपण मुले आहोत, परंतु आपण कुठेही जाऊ शकत नाही. आपण पलिष्ट्यांना मारु शकत नाही.

108 बिली ग्राहमकडे पहा तेथे उभा होता आणि तो मुसलमान म्हणत होता, "हे सिद्ध कर."

जॅक कोइकडे पहा तेथे पलीकडे उभा होता. आणि तो नास्तिक ... तो चर्च ऑफ क्राईस्ट तेथे बाहेर त्या नास्तिकाशी हात मिळवीत होता, आणि हात घेत होता. म्हणावयास ख्रिस्ती, आणि जो लेविस, एक मुक्त विचारवंतासारख्या सैतानाशी हात मिळवीत होता, आणि अगदी देवाला शाप देत होता आणि म्हणाला तेथे देव अशी काही गोष्टच नाही, कसेही करुन, प्रथमतः. आणि अशा प्रकारच्या गोष्टी मंडळीमध्ये जे स्वतःला ख्रिस्ताची मंडळी संबोधितात, त्याच्याबरोबर हस्तांदोलन करतात, आणि भाऊ जॅक कोइच्या विरुद्ध बाजू घेतात. तुम्ही कसे काय काही करण्यास जात आहात? आणि पेन्टिकॉस्टल, त्यांच्यातील कित्येक, त्याच्या विरुद्ध आहेत; जेव्हा आपल्या देशातील प्रत्येक प्रचारकाने त्याच्या खांद्याला खांदा लावून उभे राहावयास हवे, आणि म्हणावे, "देवा, तुझे सामर्थ्य खाली पाठिव." पहा, तेथे आपण आहोत. आपल्याला स्थानापन्न केले जाऊ शकत नाही.

109 एफ्राईमाला राहावयाचे नाही. त्यांच्यातील एक येथे जातो.... आपल्याला आढळते मनश्शे येथे येतो, म्हणतो, "ओह, माझ्या, परमेश्वराने तुला चांगली मक्याची शेती दिली आहे!" मग येथे, गाद येतो, म्हणतो, "बरे, आता, एक मिनिट थांब. मला खरे तर ओटाचे पीक घ्यायचे आहे, परंतु मी देखील मक्याचे पीक घेणार आहे. हालेलूया!" पहा? तुला मक्याशी काही कर्तव्य नाही. ओटचे पीक घे - ओट हा तुझा पिकाचा भाग आहे. तुला मेंढरे चारायची नाहीत जेव्हा तुला गुरे ढोरे चारणे आहे. देवाला मंडळीला योग्य स्थानात स्थानापन्न करणे आहे. परंतु त्यांच्यातील प्रत्येकाला सारखीच गोष्ट करावयाची आहे. "हालेलूया!" आणि तुम्ही त्यांना त्याबद्दल एकही गोष्ट सांगू शकत नाही. नाही, नाही. अजूनही त्यांचा स्वभाव बकऱ्यांचा आहे, "बट, बट, बट, बट, बट, बट, बट," पहा. तुम्ही त्यांना सांगू शकत नाही. ते बरोबर आहे. आता, ते सत्य नाही का?

आणि तुम्ही मंडळीला स्थानापन्न करु शकत नाही, पहा.

110 मंडळी ही पुत्राच्या दत्तकपणासाठी पूर्वनिर्धारित असावयास हवी, जेथे माणूस ... देव माणसाला घेऊ शकतो आणि त्याला कुटुंबामध्ये दत्तक घेतो, आणि त्याला काहीतरी देतो जे.... प्रथम, त्याचा प्रयास करा आणि पहा जर ते योग्य आहे. पवित्रशास्त्र म्हणते आत्म्याची पारख करा. हा मनुष्य विशिष्ट गोष्टीचा दावा करतो, त्याची पारख करा आणि पहा जर ते योग्य आहे. जर ते योग्य आहे, त्याबरोबर सरळ जा. मग म्हणा, "प्रभू, आम्हासाठी अजून काहीतरी पाठिव. आम्हाला पुढे चालवीत ठेव, पहा, अगदी आम्हाला चालते ठेव आणि प्रत्येकजण त्याची जागा घेईल." मग तुम्ही देवाच्या मंडळीला तिचे स्थान घेताना पाहणार आहात. तेव्हाच जेव्हा पलिष्टी मागे जात राहतील. तोकड्या विजारी जातील, केस लांब वाढतील, चेहरे स्वच्छ धुतले जातील, सिगारेटी गमावलेल्या असतील. ते बरोबर आहे, जेव्हा मंडळी तिच्या पराक्रमी सामर्थ्यामध्ये येण्यास सुरुवात करते, जेव्हा आपल्याकडे हनन्या आणि सप्पीरा असते, आणि त्यांच्यातील काही. होय, महाशय. तुम्ही पाहाल जेव्हा ती पवित्र मंडळी तिच्या सामर्थ्यामध्ये एकत्र उभी राहते, देवाचे पुत्र म्हणून योग्य दर्जामध्ये स्थानापन्न केली जाते, देवाच्या कुटुंबात दत्तक घेतली जाते, सामर्थ्यवान मंडळी तेथे तिच्या गौरवात उभी असते. ओह, त्याच करिता काय तो येत आहे.

111 पहा आपण किती त्यापासून दूर आहोत, भावांनो? तुम्ही अगदी शास्त्रलेखावर ही एकत्र येऊ शकत नाही. आणि कोणताही मनुष्य, कोणताही मनुष्य जो पवित्र शास्त्रात येशू ख्रिस्ताच्या नावाने पाण्याचा बाप्तिस्मा पाहू शकत नाही, तो एकतर आंधळा आहे किंवा काहीतरी मानसिकरीत्या चुकीचे आहे. ते बरोबर आहे. आणि तेथेच जेथे मोठे भांडण आहे.

मी कोणत्याही व्यक्तीला सांगतो जो मला कोणताही शास्त्रलेख आणेल जेथे कोणीतरी कधी येशू ख्रिस्ता व्यतिरिक्त इतर कोणत्या नावात बाप्तिस्मा घेतलेला असेल, नवीन मंडळीत.... किंवा, जर तो इतर दुसऱ्या कोणत्या प्रकारे बाप्तिस्मा घेतलेला असेल, पवित्र आत्मा मिळण्यासाठी, त्याला परत येशू ख्रिस्ताच्या नावात बाप्तिस्मा घेणे आहे. तुम्ही या आणि मला दाखवा. तेथे अशी कोणती गोष्ट नाही. तेथे अशी कोणती कामगिरी नाही. जेव्हा तेथे येशू म्हणाला, "त्यामुळे तुम्ही जा, सर्व राष्ट्रांना शिकवा, त्यांना पिता, पुत्र, आणि पवित्र आत्म्याच्या नावात बाप्तिस्मा द्या," पिता, पुत्र, पवित्र आत्मा, यातील एक ही नाव नाही, त्यातील कोणतेही नाही. दहा दिवसानंतर ... पेत्र सरळ वळाला आणि म्हणाला, "पश्चाताप करा, तुमच्यातील प्रत्येकाने, तुमच्या पापांची क्षमा व्हावी म्हणून, येशू ख्रिस्ताच्या नावाने बाप्तिस्मा घ्या." आणि पवित्र शास्त्रात सर्वत्र....

112 आणि मग येथे काही इतर मार्गाने बाप्तिस्मा झालेले होते, योहानाद्वारे, फक्त पश्चातापासाठी. पौल म्हणाला, "तुम्हाला परत बाप्तिस्मा घ्यावा लागेल. तुम्हाला परत यावे लागेल."

"ओह, परंतु आमचा बाप्तिस्मा महान पवित्र, योहान मनुष्याकडून झालेला आहे. त्याने येशूचा बाप्तिस्मा केला."

"हे शुभवर्तमान आहे. हा देवाचा आत्मा आहे जो मला प्रकट झाला. मी प्रभूचा प्रेषित आहे, आणि जर एखादा दूत स्वर्गातून येऊन आणि दुसरे काहीतरी प्रचार करतो...."

मला ते वाचू द्या. पवित्र शास्त्र म्हणते, "जर...." पौल म्हणाला, "जर स्वर्गातील दूताने काहीतरी सांगितले [बिशप, आर्चबिशप, पोप, अध्यक्ष, तो जे काही असेल], जर तो काहीतरी प्रचार करील त्या व्यतिरिक्त जो काही मी तुम्हाला प्रचार केला आहे, तो शापित असो. तेथे नाही.... आपल्यामध्ये अशी कोणती रीत नाही. नाही, महाशय. तुम्ही फक्त.... तेथे अगदी अशी कोणती गोष्ट नाही." आणि मग, पहा, का असे की लोक ते पाहू शकत नाहीत? का असे की लोक विश्वास करीत नाहीत? पहा? [कोणीतरी मंडळीतून बोलते, "पूर्वनिर्धारित."] कोणीतरी अगदी सरळ तेथे प्रहार केला, जेन. पूर्वनिर्धारित, तंतोतंत. का? "पित्याने जे मला दिले आहे [काय?] ते सर्व माझ्याकडे येतील." तंतोतंत. "पित्याने दिलेले सर्व माझ्याकडे येतील." (माझ्याबरोबर काय बाब आहे, मी येथे शोधण्याचा प्रयत्न करीत आहे? आपण येथे आहोत. ठीक आहे.)

113 मला फक्त हे पद वाचू द्या आणि मग मी तुम्हाला सांगेन काय पौल ... त्या गोष्टी ज्या.... प्रत्यक्ष हा संदेश जो आज रात्री मी प्रचार केला, येथे जेथे पौल पूर्वनिर्धारितपणावर काय म्हणाला, येशूच्या नावात पाण्याच्या बाप्तिस्म्यावर, पवित्र आत्म्याच्या बाप्तिस्म्यावर, मंडळीच्या स्थानावर, आणि इत्यादी. येथेच जे काही तो म्हणाला.

मला आश्चर्य वाटते की [गलतीकरांस हे सांगत आहे] ज्याने तुम्हास ... ख्रिस्ताच्या कृपेत ... पाचारण केले त्याच्यापासून तुम्ही इतके लवकर....

[दुसऱ्या भाषेत, मला तुमची लाज वाटते, की तुम्ही कोणाला तरी येऊन, यापासून तुम्हाला दूर नेऊ दिले], अन्य सुवार्तेकडे वळत आहात:

ती दुसरी नाही; पण तुम्हास घोटाळ्यात पाडणारे, व ख्रिस्ताची सुवार्ता विपरीत करु पाहणारे [ख्रिस्ताची वास्तविक सुवार्ता विपरीत करणे] कित्येक आहेत.

114 परंतु पहा. आता, लक्षात आहे, तो पौल होता ज्याने प्रत्येक व्यक्तीला ज्याचा येशू ख्रिस्ताच्या नावात बाप्तिस्मा झाला नव्हता त्याला येऊन परत येशू ख्रिस्ताच्या नावात बाप्तिस्मा घेण्यास भाग पाडले होते. किती जणांना ठाऊक आहे ते सत्य आहे? किती जणांना ठाऊक आहे तो पौल होता जो म्हणाला ही रहस्ये जगाच्या स्थापनेपासून गुप्त ठेवण्यात आली होती जी त्याला प्रकट करण्यात आली होती? की आपण दत्तकपणासाठी, पुत्र म्हणून पूर्वनिर्धारित केले गेले होतो. तो पौल होता. येथे पहा तो काय म्हणाला.

परंतु जी सुवार्ता आम्ही तुम्हाला सांगितली, तिच्याहून निराळी सुवार्ता आम्ही सांगितली, किंवा स्वर्गातून आलेल्या देवदूताने सांगितली, तरी तो शापभ्रष्ट असो.

फक्त असे म्हणू नका, "मिस्टर, मी तुझ्याशी सहमत नाही." फक्त तो शापभ्रष्ट असो. मला पुढचे पद वाचू द्या.

आम्ही अगोदर सांगितले तसे, मी आता ही पुन्हा सांगतो की, जी तुम्ही स्वीकारली तिच्याहून निराळी सुवार्ता कोणी तुम्हास सांगितल्यास, तो शापभ्रष्ट असो.

115 ते बरोबर आहे. आता, भावा, बहिणी, जर त्या दिवशी तो देव होता (आणि मी ते सांगतो, अनादर करीत नाही अशी आशा करतो) ज्याने मला ते लहानसे पाहण्यासाठी नेले.... आता, मी उत्साहित होतो ... मी अंदाज करीत नाही की मी उत्साहित होतो, मी केवळ आशीर्वादित होतो प्रचारामध्ये. माझा स्वतःवरचा संयम सुटतो आणि मला ठाऊक आहे तुम्ही झोपी जाण्याच्या आणि थकण्यापर्यंत मी तुम्हाला ठेवतो. परंतु, ओह, जर तुम्हाला केवळ ठाऊक असते मला तुम्ही पलीकडे किती हवे आहात! पहा? आणि जेव्हा मी - एकदा मी परत असे म्हणालो - जेव्हा तो म्हणाला.... मी म्हणालो, "ते करील...."

तो म्हणाला, "तुला पाहायला आवडेल अंत काय असेल?"

116 आणि मी मागे पाहिले आणि स्वतःला बिछान्यावर झोपलेले पाहिले. निश्चित तुम्ही मला चांगल्या प्रकारे ओळखता हे समजण्यासाठी की मी तुम्हाला सत्य सांगत आहे. मला तुम्हाला काहीतरी विचारावयाचे आहे, जसे शमुवेल अभिषिक्त शौलासमोर म्हणाला, "कधी मी तुम्हाला परमेश्वराच्या नावात काही सांगितले काय जे सत्य नव्हते?" ते बरोबर आहे? ते नेहमीच सत्य होते. कधी मी तुमच्याकडे येऊन पैशाची भीक मागितली किंवा अशा प्रकारे काहीतरी? नाही, महाशय, मी कधीही नाही. तुम्हाला ख्रिस्ताकडे नेण्यासाठी माझे उत्तम प्रयत्न केल्याखेरीज मी कधी काही केले आहे? तंतोतंत.

आता त्यांना म्हणायचे आहे मी मानसिक दूरसंवेदन करणारा आहे, तुम्हाला माहित आहे, उत्कृष्ट ज्ञानेंद्रियांची समज असलेला. अर्थात, त्या गोष्टी उदभवणेच आहे. पवित्र शास्त्र म्हणते त्या उदभवतील. जसे यान्नेस व यांब्रेसने मोशेला अडविले, त्यांनी अगदी त्याच गोष्टी केल्या ज्या मोशेने केल्या, जोपर्यंत निकरावर येण्याची परिस्थिती येत नाही. ते बरोबर आहे. परंतु लक्षात ठेवा, यान्नेस व यांब्रेस आरोग्य देऊ शकले नाही. ते आरोग्य देऊ शकले नाही. ते पीडा आणू शकले, परंतु त्यांना दूर करु शकले नाही, पहा. ठीक आहे. आता, देव हा आरोग्यदाता आहे. देवाचे वचन सत्य राहते.

117 मी तुम्हाबरोबर प्रामाणिक राहण्याचा प्रयत्न केला आहे. मी तुम्हाला सत्य सांगण्याचा प्रयत्न केला आहे. मी ... सुमारे एकतीस वर्षे, मी या उपदेशमंचावर उभा राहिलो आहे, ठराविक काळानुसार, एकतीस वर्षांसाठी; आणि कधीतरी या उपदेशमंचावरुन गौरवात जाण्यासाठी निघेन. तेथे पत्नी, मुलगी, वडील, भाऊ, सर्व तेथेच अगदी दफन केलेले आहेत, मूल्यवान मित्र. मी त्यांची शवपेटी आणि येथे ठेवलेली फुले पाहिली आहेत, आणि माहिती आहे कधीतरी माझी देखील, ठेवली जाईल. आता, ते सत्य आहे. परंतु प्रामाणिकपणे, माझ्या संपूर्ण हृदयाने, मी तुम्हाला माझ्या सर्व हृदयापासून सांगतो, मी विश्वास करतो मी तुम्हाला प्रभू येशू ख्रिस्ताची सत्य सुवार्ता प्रचार केली आहे. मी विश्वास करतो की, तुम्हातील प्रत्येक जणाने, येशू ख्रिस्ताच्या नावात बाप्तिस्मा घ्यावयास हवा, आणि पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा प्राप्त करावयास हवा. आणि जेव्हा तुम्ही कराल, तो तुम्हाला आनंद, शांती, सहनशीलता, चांगुलपण, सौम्यता, नम्रता, धीर, विश्वास आणील.

118 आणि त्या दिवशी, त्या सकाळी मला काय झाले मला ठाऊक नाही. अजूनही मी सांगू शकत नाही की मी माझ्या शरीरात येथे होतो आणि फक्त दृष्टांत पाहिला, किंवा मला येथून तेथे नेण्यात आले. मला ठाऊक नाही. मी सांगू शकत नाही. फक्त मला एक गोष्ट ठाऊक आहे, की मी नेहमी मरण्यास घाबरत असे, ती लहानशी डंखाची जागा. परंतु त्याची भीती नाही की येशू येऊन मला घेणार नाही, आता, मला ती भीती नव्हती, कारण मला त्याची भीती नव्हती; परंतु जर मी तुम्हाला भेटलो आणि फक्त जुना लहानसा भ्रम तेथे हवेमध्ये तरंगताना असेल. परंतु मी आता पाहतो. जेव्हा मी त्या लोकांना पाहिले, ते वास्तविक होते.

119 कधी कोणता मनुष्य असेल ज्याने कधी पेन्टिकॉस्टला दर्शविले असेल आणि खरा प्रेषित असेल, तर तो एफ एफ बॉसवर्थ होता. स्वच्छ, सरळ, वास्तविक सुवार्ता, पहा, तो बॉसवर्थ होता. आणि जेव्हा मी त्याला माझ्या बाहूंमध्ये पकडले, आणि मी ओरडलो, "माझ्या बापा, माझ्या बापा, इस्राएलाच्या रथांनो आणि राऊतांनो."

तो म्हणाला, "मुला, क्षेत्रावर रहा." म्हणाला, "परदेशातील क्षेत्रात जाणाऱ्या यातील काही तरुण लोकांना मार दे, जर तू देऊ शकतो, ते खूप काही धर्मवेडेपणा तेथे नेण्याअगोदर. जी वास्तविक सुवार्ता तुझ्याकडे आहे ती त्यांना तेथे नेऊ दे, पहा." तो म्हणाला, "तुझी सेवा अजून सुरु झाली नाही ती ज्या करिता आली आहे." म्हणाला, "तू अगदी नवीन ब्रॅन्हम आहेस." म्हणाला, "मुला, तू तरुण आहेस."

मी म्हणालो, "भाऊ बॉसवर्थ, मी अठ्ठेचाळीस वर्षाचा आहे."

तो म्हणाला, "तू अजून सुरुवात केली नाहीस." तो म्हणाला, "तू तेथे जाण्यापूर्वी, या तरुण पेन्टिकॉस्टल प्रचारकांना खूपशा निरर्थक गोष्टींनी तेथे जाऊ देऊ नको, आणि गोष्टी विषमय करुन, आणि सर्व मुत्सद्दी आणि देशाला या विरुद्ध करु देऊ नको." म्हणाला, "भाऊ ब्रॅन्हम, पुढे जा, तुझ्याकडे जी सुवार्ता आहे त्याबरोबर पुढे जा." तो म्हणाला, "मी विश्वास करतो, आपल्या देव परमेश्वराचा, तू प्रेषित, किंवा संदेष्टा आहेस."

120 मी त्याच्याकडे पाहिले, माझ्या बाहूंमध्ये मी त्याला मिठी मारली. मी म्हणालो, "भाऊ बोसवर्थ, मला तुला एक प्रश्न विचारायचा आहे. ज्यामध्ये तू इतकी वर्ष प्रचार केला ... त्यातील तुझा सर्वात आनंद समयाचा क्षण कोणता होता?"

तो म्हणाला, "अगदी आताचा, भाऊ ब्रॅन्हम."

मी म्हणालो, "तुला माहित आहे तू मरत आहेस."

तो म्हणाला, "मी मरु शकत नाही."

मी म्हणालो, "का तू म्हणतोस हा तुझा सर्वात आनंदाचा समय आहे?"

तेथे लहानसा दरवाजा होता. तो म्हणाला, "मी त्या दरवाज्याकडे माझे तोंड करुन झोपलेलो आहे. कोणत्याही मिनिटाला, तो एक ज्याला मी प्रेम केले आहे, आणि एक ज्याच्यासाठी मी प्रचार केला आहे आणि संपूर्ण माझे जीवन ... त्याच्यासाठी उभा राहिलो, तो त्या दरवाज्यातून माझ्यासाठी येईल, आणि मी त्याच्याबरोबर जाईन." मी त्याच्याकडे पाहिले, मी विचार केला, मी अगदी तसाच पाहत होतो जसा मी अब्राहाम, इसहाक, किंवा याकोबाकडे पाहिले असते.

मी त्याचा हात घेतला. मी म्हणालो, "भाऊ बोसवर्थ, आपण दोघे एकाच देवावर विश्वास करतो, आपण सारख्याच गोष्टीवर विश्वास करतो. देवाच्या कृपेद्वारे मी शेवटचा श्वास माझा देह सोडीत नाही तोपर्यंत प्रचार करीन. मी देवाबरोबर सत्यतेने राहीन जसे मला ठाऊक आहे की कसे राहावे. मी सुवार्तेबरोबर कोणत्याही बाजूने किंवा कोणत्याही ठिकाणी तडजोड करणार नाही. मी सत्य राहीन जसे मला ठाऊक आहे कसे राहावे. भाऊ बोसवर्थ, मी तुला चांगल्या भूमीत भेटेन जेथे तू तरुण असणार नाहीस ... किंवा, अजून कधीही वृद्ध होणार नाहीस, परंतु तरुण असशील."

तो म्हणाला, "तू तेथे असशील, भाऊ ब्रॅन्हम, तू चिंता करु नको."

121 आणि एका तासा अगोदर ... तो मरण्याच्या दोन तास अगोदर, सुमारे दोन महिन्यांनंतर.... मी विचार केला तेव्हा तो मरत होता. माझी पत्नी आत आली आणि त्याला पाहिले (तो नेहमी तिच्याबद्दल खूपच विचार करी), आणि तेव्हा मिसेस बोसवर्थ. आणि सुमारे दोन तास.... तो तेथे पडलेला झोपला होता. तो उठला, त्याने पाहिले, आणि तो त्याच्या बिछान्यावरुन उडी मारुन उठला. तो म्हणाला, "आई! बरे, कित्येक वर्षांपासून मी तुला पाहिले नव्हते! बाबा! भाऊ जिम! का," म्हणाला, "पाहूया, तू माझा इल्लिनॉईस, जॉलीएट मधील एक प्रभू करिता परिवर्तन झालेला एक होतास." [तो मरुन पन्नास वर्ष झाली होती.] होय!" तो म्हणाला, "येथे बहीण अमुक आणि अमुक आहे. होय, विनीपेग सभेमध्ये

मी तुला प्रभूकडे आणले. होय. का, येथे बहीण अमुक आणि अमुक आहे. मी तुला पाहिले नाही.... होय, पहा, तू प्रभूकडे अमुक आणि अमुक जागेवरुन आलास." आणि सरळ दोन तास त्याने त्या सर्वांशी हात मिळविला ज्यांना त्याने प्रभूकडे आणले होते. परत चालत मागे गेला त्याच्या जागेवर, आणि झोपला, त्याच्या हातांची घडी घातली, आणि ते तेवढेच होते. भाऊ एफ. एफ. बोसवर्थने त्या भूमीत प्रवेश केला का जी येशूने त्या रात्री मला पाहू दिली? जर होय असेल, तो आज रात्री तेथे तरुण मनुष्य आहे. देव त्याच्या प्राणाला विसावा देतो. आणि मी देखील कधी इतका विश्वासयोग्य राहो की मी त्या भूमीमध्ये प्रवेश करीन. आणि मी इतका ख्रिस्ताचा खरा दास असू दे....

122 मला माझ्या जीवनाची लाज वाटते. मला लाज वाटते. परंतु जर मी तुम्हा लोकांसमोर पाप केले असेल, तुम्ही माझे देणे लागता की येऊन मला सांगावे, पहा. देवाने मला जे काही त्याच्या कृपेने करु दिले त्या सर्वामध्ये मी सचोटीने राहण्याचा प्रयत्न करतो, पहा. परंतु, पहा, मित्रांनो, तुम्ही माझे देणे लागता जर तुम्हाला काहीतरी माहित आहे जे माझ्या जीवनात चुकीचे आहे, या आणि ते मला सांगा. आणि, पहा, मी तुमचे देणे लागतो की येथे उभे राहावे आणि तुम्हाला सत्य सुवार्तेचा प्रचार करावा. मी तुमचे देणे लागतो, कारण मी तुम्हा सर्वांचे चेहरे, तरुण पुरुष आणि स्त्रिया, अगदी त्या रेषेपलीकडे पाहण्याची अपेक्षा करतो. जेथे तुम्ही आता आहात आणि ते, यामध्ये केवळ एका श्वासाचे अंतर आहे. आता, ते बरोबर आहे. ते तेथे आहे.

123 आणि देव जो सर्व कृपेचा आहे, स्वर्गाचा देव - अधार्मिक नाही, परंतु आदराने, "पापा" - त्या महान दिवशी जेव्हा आपल्याला परत मागे येथे सादर केले जाईल आणि परत आपली पृथ्वीवरील शरीरे असतील, जेणेकरुन आपण पिऊ शकतो, आणि द्राक्षे खाऊ शकतो आणि भूमीतील फळे.... ते घरे बांधतील आणि दुसरे त्यामध्ये वास करणार नाही. ते द्राक्षीचा मळा लावतील आणि दुसरे त्यातून खाणार नाही, पहा. एक माणूस द्राक्षीचा मळा लावील, त्याचा पुत्र तो घेईल, आणि मग त्याचा पुत्र तो घेईल, आणि त्याचा. परंतु या बाबीमध्ये नाही - तो तो लावील आणि तेथे राहील. पहा, ते बरोबर आहे. आपण तेथे युगानुयुग असू. आणि त्या भूमीमध्ये, मी तुम्हा सर्वांना पाहो.

124 आणि मला ठाऊक आहे येथे मी अगदी त्रैक्यवादी सेवकांशी बोलत आहे. आणि, माझ्या भावांनो, मी हे दुखविण्यासाठी बोलत नाही. मी देखील, त्रैक्यवादी आहे. मी त्रैक्यात विश्वास करतो, देवाचे तीन गुण (पिता, पुत्र, आणि पवित्र आत्मा), परंतु तीन देव नाही, पहा. मी तीन गुणांमध्ये विश्वास करतो. पूर्णपणे. ते मी माझ्या संपूर्ण हृदयापासून करतो. पिता, पुत्र, आणि पवित्र आत्मा, परंतु ते तीन देव नाहीत. ते अगदी तीन गुण आहेत, किंवा देवाची तीन कार्यालये. एकदा देव पितृत्वामध्ये राहिला, पुत्रत्वामध्ये, आणि आता पवित्र आत्म्यामध्ये आहे. तो एकच देव तीन कार्यालयात आहे. आणि त्यांच्याकडे....

आणि पिता, पुत्र, आणि पवित्र आत्मा, हे देवाचे नाव नाही. देवाला एक नाव आहे, आणि त्याचे नाव येशू आहे. पवित्र शास्त्र म्हणते, "स्वर्गातील कुटुंबाला येशू नाव दिले आहे, आणि पृथ्वीवरील कुटुंबाला येशू नाव दिले आहे." ते बरोबर आहे. तेव्हा देवाला एक नाव होते, मानवी नाव. त्याला यहोवा-यिरे हे नाव होते, यहोवा-राफा ... ती त्याच्या देवत्वाची शीर्षके होती. परंतु त्याला एक नाव होते - येशू! तो तो आहे.

आणि खरोखर, माझ्या बंधूंनो, जर तुम्ही माझ्याबरोबर असहमत असाल, लक्षात ठेवा, मी तुम्हाला तेथे पलीकडे भेटेन, कसेहीकरुन, पहा. मी तुमच्याबरोबर तेथे असेन. आणि देव तुम्हाला आशीर्वादित करो. आणि मी तुम्हाला प्रेम करतो.

125 आणि मला हवे आहे की मंडळीने लक्षात ठेवावे, आता, रविवारी सकाळी आपण येथून सुरु करणार आहोत. आणि मी तुम्हाला दोन वाजेपेक्षा जास्त काळ न थांबवण्याचा प्रयत्न करणार आहे, जेणेकरुन तुम्हाला दुपारची सभा मिळावी, जर शक्यता असेल तर करु, आणि जर मी केले जसे मी आज रात्री केले, साडेदहा पर्यंत. तुम्ही मला माफ कराल? मित्रांनो, आपल्याकडे जास्त वेळ उरला नाही, प्रियांनो. मी तुम्हाला "प्रियांनो" संबोधितो कारण तुम्ही आहात. तुम्ही माझे प्रिय आहात. तुम्हाला माहिती आहे काय? येथे शास्त्रलेख येतो. पौल म्हणाला, "मला तुम्हाविषयी [त्याची मंडळी] वाटणारा हेवा हा ईश्वरप्रेरित हेवा आहे, कारण मी एका पतीबरोबर तुमचे वाग्दान केले आहे...." तेथे तुम्ही आहात, ते मिळाले आहे. बस एवढेच. "कारण मी तुमचे वाग्दान केले आहे, तुमचा वाङनिश्चय केला आहे, ख्रिस्ताला एक शुद्ध कुमारी म्हणून."

126 आता, जर ते खरे होते मग, त्या दिवशी तो म्हणाला ... लोक मला म्हणाले, म्हणाले, "येशू तुझ्याकडे येईल, आणि तू आम्हाला त्याला सादर करशील," एक शुद्ध कुमारी, त्या वचनाद्वारे पारखलेली जे तू त्यांना प्रचार केले. आणि, पहा, जर मी तुम्हाला प्रचार करतो अगदी जो पौलाने त्याच्या मंडळीला प्रचार केला, जर त्याचा जमाव आत जातो, आपला देखील जाईल, कारण आमच्याकडे समान गोष्ट आहे. आमेन. आपण, "देव तुम्हाला आशीर्वादित करो," असे म्हणत असताना आता आपली मस्तके झुकवुया.

Sermons By
विल्यम मॅरियन ब्रन्हम ह्यांच्या द्वारे प्रचार केले गेलेले उपदेश
"...वाणी होईल त्या दिवसात..." प्रकटी. १०:७